रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १९ • अंक ९०
www.ramprahar.com

शनिवार, १७ ऑक्टोबर २०२६ • पाने ८ • किंमत ₹२

## अंतरंग

लोहारे येथे विद्यार्थिनीशी छेडछाड; आरोपीला अटक/२
कळंबोलीत कौटुंबिक वादातून पत्नीची हत्या/३
बॅडमिंटन स्पर्धेत जिंदल विद्यामंदिरचा 'दुहेरी स्मॅश'/८

## एमपीएससी अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार सतिश वाघोलेंकडे



**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार आयोगाचे सदस्य सतिश बबन वाघोले यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. या संदर्भातील अधिकृत आदेश राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत जारी करण्यात आले आहेत. एमपीएससी पेपरफुटीतील चौकशी पूर्ण होईपर्यंत सध्याचे अध्यक्ष विवेक भीमनवार रजेवर गेले आहेत. यानंतर एमपीएससी सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे देण्यात आला होता, तर आता अध्यपदाचा अतिरिक्त कार्यभार सतिश बबन वाघोले यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. दरम्यान, एमपीएससी परीक्षांमधील गैरप्रकारांच्या चौकशीसाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली आयोगाची स्थापना करण्यात आली असून निवृत्त न्यायमूर्ती दिलीप भोसले चौकशी आयोगाचे अध्यक्ष असणार आहेत.

# दुष्काळग्रस्तांसाठी मदतीचा ओघ

### मुख्यमंत्री आणि भाजप प्रदेशाध्यक्षांकडे धनादेश सुपूर्द





**मुंबई, डोंबिवली : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात यंदा कमी पर्जन्यमानामुळे कोरडा दुष्काळ पडला असून विविध भागांमध्ये पीक-पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत आहे. अशा वेळी मदतीचे हात पुढे आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे शेतकऱ्यांसाठी मदतीचे धनादेश सुपूर्द करण्यात येत आहेत.

राज्याला सध्या दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागत आहेत. कोरडी पडलेली धरणे, तळाला गेलेली भूजल पातळी आणि करपून गेलेली पिके राज्यातील ग्रामीण भागाचे विदारक चित्र अधोरेखित करत आहेत. राज्यात यापूर्वीच २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. त्यामध्ये नंतर आणखी ४० तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे आता दुष्काळी तालुक्यांची संख्या ३०५ इतकी झाली आहे. या तालुक्यांमध्ये दुष्काळी उपाययोजना करण्यास शासन-प्रशासनाकडून प्राधान्य देण्यात येत आहे.

दुष्काळासारखे मोठे नैसर्गिक संकट केवळ सरकारी अनुदानावर किंवा प्रशासकीय आदेशांवर पूर्णपणे पेलता येत नाही. त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाची साथ आवश्यक असते. दिलासादायक बाब म्हणजे, संकटसमयी धावून जाण्याची महाराष्ट्राची जी प्रदीर्घ परंपरा आहे, ती याही वेळी पाहायला मिळत आहे. शासन-प्रशासकीय पातळीवरील प्रयत्नांना बळ देण्यासाठी राज्यातील सेवाभावी मंडळी पुढे आली आहेत. धार्मिक कार्यासोबतच सामाजिक बांधिलकी जपत काही देवस्थानांनीही दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांसाठी मदत देऊ केली आहे. मुख्यमंत्री सहायता निधीत आर्थिक मदत देऊन त्यांनी एक नवा आदर्श घालून दिला आहे.

दरम्यान, भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये पाच लाख रुपये देणगीचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे आभार मानले.

दुसरीकडे महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी भाजप परिवारातील नगरसेवक, कार्यकर्ते आणि संवेदनशील नागरिक एकत्र येत आहेत. नमो रमो नवरात्री उत्सवात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षासाठी अनेकजण पुढाकार घेत भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे मदतीचा धनादेश सुपूर्द करीत आहेत. भक्तीच्या सोहळ्यातून शेतकरी बांधवांप्रती माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा हा स्तुत्य प्रयत्न मानला जात आहे.

# देशात अराजकता पसरवून सत्ता मिळवण्याचा काँग्रेसचा प्रयत्न

### केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांचा हल्लाबोल



**लखनऊ : वृत्तसंस्था**

केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी शुक्रवारी (दि.१६) काँग्रेसवर जोरदार हल्ला चढवला. देशात अराजकता निर्माण करून सत्ता मिळवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप त्यांनी लखनऊ येथील भाजपच्या राज्य कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत केला. लोकशाही व्यवस्था अराजकतेच्या माध्यमातून चालत नसते हे राहुल गांधी यांनी समजून घेतले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दिल्लीतील अलीकडील घटनांचा संदर्भ देत केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांनी काँग्रेस आणि तिच्या सहकारी पक्षांवर तरुणांच्या ऊर्जेचा वापर राष्ट्रउभारणीसाठी करण्याऐवजी राजकीय संघर्षासाठी केला जात असल्याकडे लक्ष वेधले. तरुणांना अराजकतेच्या राजकारणात ओढण्याचा प्रयत्न होत असल्याचे सांगत काही नेत्यांकडून बांगलादेशमधील सत्तापालटाचा संदर्भ दिला जात असल्याचे ते म्हणाले. सरकार उलथवून टाकण्यासंदर्भातील वक्तव्यांवरही त्यांनी आक्षेप घेतला. त्यांच्या मते, सत्तापालटासारख्या शब्दांचा वापर हा निवडणूक सुधारणा, एसआयआर, ज्ञानेश कुमार किंवा तरुणांच्या भविष्याशी संबंधित प्रश्नांपेक्षा देशात अस्थिरता निर्माण करून सत्ता मिळवण्याच्या प्रयत्नांचे संकेत देतो.

लोकशाहीच्या नावाखाली घटनात्मक संस्थांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे किंवा देशाच्या विकासात अडथळे निर्माण करणे योग्य नसल्याचे ना. राजनाथ सिंह यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील टिप्पणीचाही त्यांनी या संदर्भात उल्लेख केला. कायदा आणि सुव्यवस्था टिकवण्यासाठी कायद्याचा आदर करणे आवश्यक असल्याचे नमूद करत त्यांनी राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना जनमताचा सन्मान करण्याचे आवाहन केले. लोकशाहीचे रक्षण करण्याच्या नावाखाली विघातक राजकारण करण्याऐवजी आपल्या राजकीय भूमिकेचे आत्मपरीक्षण करावे, असा सल्लाही त्यांनी विरोधकांना दिला.

### सत्तेसाठी आंदोलनाचा खेळ -मुख्यमंत्री

**मुंबई :** सीजेपी आणि विरोधी पक्षांकडून दिल्लीत सुरू असलेले आंदोलन म्हणजे सत्तेसाठी सुरू असलेला खेळ आहे, असा हल्लाबोल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.१६) केला. ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण यांचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर शेअर करत हे सर्व सत्तेसाठी सुरू असल्याची टीका त्यांनी केली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "अखेर मनात लपलेली गोष्ट ओठांवर आलीच. देशात अस्थिरता निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. सर्व खेळ सत्तेची खुर्ची मिळवण्याचा आहे. मग त्यासाठी विद्यार्थी, शेतकऱ्यांना चिथावणी द्यावी लागली तरी चालेल. जाती, भाषेच्या नावावर द्वेष परसवावा लागला तरी चालेल. देशाच्या प्रतिष्ठित संस्थांची प्रतिमा मलीन केली जात आहे. आंदोलनाच्या आडून अराजकता पसरवण्याचा यांचा उद्देश आहे", असेही त्यांनी म्हटले आहे.

# 'सीकेटी'च्या विद्यार्थिनींची राष्ट्रीय शिबिरासाठी निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्यासोबतच देशाच्या सांस्कृतिक वैविध्याची ओळख करून देणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील 'वंदे मातरम् युवा विनिमय शिबिरासाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील (अधिकारप्रदत्त स्वायत्त) तीन विद्यार्थिनींची निवड झाली आहे.

भारत सरकारच्या युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाच्या माय भारत उपक्रमांतर्गत आयोजित हे सात दिवसीय राष्ट्रीय शिबिर १५ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत गुजरातमधील पोरबंदर येथे होणार आहे. या प्रतिष्ठेच्या शिबिरासाठी निवड झालेल्या विद्यार्थिनींमध्ये द्वितीय वर्ष कला शाखेतील दिव्या गोविंद यादव, द्वितीय वर्ष जैवतंत्रज्ञान शाखेतील मृण्मयी संजय फल्ले आणि प्रांजली प्रदीप लोहारे यांचा समावेश आहे. त्या या शिबिरात महाविद्यालयासह रायगड जिल्हा आणि महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील.

**लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा**



या निवड प्रक्रियेत रायगड जिल्ह्याच्या युवा अधिकारी साक्षी गुप्ता आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. युवा व सांस्कृतिक विनिमय कार्यक्रमांचे नोडल अधिकारी प्रा.ए.व्ही. पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.ए.एस. भानुशाली, डॉ.एल.क्यू. रेहमान, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.बी.एम. भोईर आणि एनएसएस अभ्यासक्रम समन्वयक प्रा.आर.बी. माने यांनी परिश्रम घेतले.

विद्यार्थिनींच्या या निवडीबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख आणि सचिव डॉ. एस.टी. गडदे यांनी विद्यार्थिनींशी मुक्त संवाद साधत त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अत्याचार, खूनप्रकरणी नराधमाला फाशीची शिक्षा

**मालेगाव : प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणाऱ्या मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील साडेचार वर्षीय बालिकेवरील लैंगिक अत्याचार आणि निर्घृण खून प्रकरणात न्यायालयाने नराधम विजय खैरनार (२४) याला फाशीची शिक्षा सुनावली आहे.

या खटल्यात सरकारी पक्षाकडून एकूण २४ साक्षीदार तपासण्यात आले. अटक झाल्यापासून आरोपी खैरनार हा कारागृहात असून शुक्रवारी (दि.१६) खटल्याच्या अंतिम निकालाच्या वेळीदेखील त्याला व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारेच न्यायालयात हजर करण्यात आले होते. लैंगिक अत्याचार व हत्येप्रकरणी फाशी तसेच अपहरण व पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी प्रत्येकी सात वर्षे सश्रम कारावास आणि दोन हजार रुपये दंड अशी शिक्षा न्यायालयाने आरोपीला सुनावली. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी म्हणून विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी न्यायालयात प्रभावी युक्तिवाद केला. यावेळी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे हेही न्यायालयात हजर होते.

## निवडक

### अभिजीत दिपके, नेहा बोरा दिल्ली पोलिसांच्या ताब्यात

**नवी दिल्ली :** कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी शुक्रवारी (दि.१६) दिल्लीतील कनॉट प्लेस येथील सेंट्रल पार्कमध्ये आंदोलनाची घोषणा केली होती, मात्र तत्पूर्वीच त्यांना पोलिसांनी निवासस्थानाहून ताब्यात घेतले. राजधानीतील कायदा व सुव्यवस्था बिघडू नये यासाठी ही कारवाई करण्यात आली, तर आंदोलनादरम्यान नेहा बोरासह डाव्या पक्षाच्या कार्यकर्त्यांची पोलिसांनी धरपकड केली.

### सचिन वाझेच्या जामिनावरील निकाल हायकोर्टाने राखून ठेवला

**मुंबई :** अँटिलिया स्फोटके प्रकरणातील मुख्य आरोपी सचिन वाझे याच्या जामिनावरील निकाल शुक्रवारी (दि.१६) उच्च न्यायालयाने राखून ठेवला. यावर हायकोर्ट आपला अंतिम निकाल देत नाही तोपर्यंत सचिन वाझेच्या जामिनावरील स्थगिती कायम असून त्यांचा मुक्काम कारागृहातच राहील, असे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि निला गोखले यांच्या खंडपीठाने निकाल राखून ठेवताना स्पष्ट केले.

# अलिबागमध्ये तरुणाचा संशयास्पद मृत्यू

**अलिबाग : प्रतिनिधी**

पर्यटनास आलेल्या एका तरुणाचा वरसोली येथील एका लॉज संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, तरुणाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला हे शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.

मुरुड तालुक्यातील कोर्लई येथील २५ वर्षीय तरुण होणाऱ्या पत्नीसोबत वरसोली समुद्रकिनारी फिरण्यास आला होता. वरसोली येथील एका लॉजवर त्यांनी रूम आरक्षित केली. या ठिकाणी वास्तव्यास असताना तरुणाचा अकस्मात मृत्यू झाला. त्यानंतर तरुणीने त्याचा मृतदेह सायंकाळी ६च्या सुमारास अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात आणला. यावेळी तरुणाचे नातेवाईकही रुग्णालयात पोहचले. मृतदेहाचे शवविच्छेदन करायचे नाही असे सांगून ते मृतदेह घेऊन गेले. (पान २ वर..)

### वैद्यकीय अधिकाऱ्यांचा बेजबाबदारपणा

दरम्यान, तरुणाच्या संशयास्पद मृत्यूनंतर मृतदेह अपघात विभागात आणण्यात आला होता. हा मृत्यू संशयास्पद असल्याने त्याबाबत तातडीने पोलिसांना वर्दी देणे आणि मृतदेहाचे शवविच्छेदन करून घेणे आवश्यक होते, मात्र यावेळी अपघात विभागात कार्यरत असलेल्या महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृतदेह नातेवाईकांना तसाच घेऊन जाऊ दिला. ही बाब रुग्णालय प्रशासन आणि पोलिसांच्या लक्षात आल्यावर त्यांनी शोधाशोध सुरू केली आणि मृतदेह नातेवाईकांना पुन्हा रुग्णालयात घेऊन येण्यास भाग पाडले. त्यामुळे या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणाची खातेनिहाय चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

# राज्यस्तरीय गणेशोत्सव स्पर्धेचे पुरस्कार वितरण

### मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव



**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत आयोजित राज्यस्तरीय उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२६मध्ये सांगली जिल्ह्यातील येडेनिपाणी येथील मोरया गणेश मंडळाने प्रथम क्रमांक पटकावला. नांदेड जिल्ह्यातील छत्रपती सार्वजनिक गणेश मंडळ दिपनगरने द्वितीय, तर परभणी जिल्ह्यातील स्वराज्य गणेश मंडळ देवनांद्राने तृतीय क्रमांक मिळविला.

आंतरराष्ट्रीय स्तरावर हाँगकाँगच्या महाराष्ट्र मंडळाने, तर राष्ट्रीय स्तरावर देहरादूनच्या महाराष्ट्र समाज सेवा समितीने प्रथम क्रमांक मिळविला. यंदा प्रथमच जाहीर करण्यात आलेल्या वेलिंग-खातू गणेशमूर्तीकार पुरस्काराचे पहिले मानकरी राजन विष्णू पाटकर ठरले. या स्पर्धेतील विजेत्या मंडळांचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवारी (दि.१६) प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिरात सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते झाला. यावेळी विजेत्या मंडळांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले.

गणेशोत्सवाला जागतिक वारसा म्हणून मान्यता मिळावी यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. गणेशोत्सवाची व्याप्ती वाढविण्यात आली असून देश-विदेशातील गणेशोत्सवाच्या परंपरा, कथा आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये 'Bappa.org' या व्यासपीठावर संकलित करण्यात येणार आहेत. 'युनेस्को'च्या यादीत गणेशोत्सवाचा समावेश व्हावा या दिशेनेही प्रयत्न करण्यात येत असल्याचे मंत्री ॲड. शेलार यांनी बोलताना सांगितले.



# रायगडात १५व्या वित्त आयोगातून पाणीटंचाई कमी होणार

## ५२.७२ कोटींचा थकीत निधी प्राप्त; सर्व मतदारसंघांना समान वाटप

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेत चार वर्षे प्रशासकीय कारभार सुरू असताना १५व्या वित्त आयोगाचा थकीत ५२ कोटी ७२ लाख ८० हजार ९९० रुपयांचा निधी अखेर प्राप्त झाला आहे. या निधीतून पाणीपुरवठा आणि स्वच्छतेच्या कामांना प्राधान्य दिले जाणार आहे. आगामी काळात जिल्ह्यात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता या निधीचा उपयोग पाणीपुरवठ्याच्या सुविधा बळकट करण्यासाठी केला जाणार असल्याचे जिल्हा परिषदेच्या प्रशासनाकडून सांगण्यात आले.

ग्रामविकास विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार १५व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त झालेल्या बंधित आणि अबंधित निधीच्या सुधारित विकास आराखड्याला चार महिन्यांपूर्वी झालेल्या सर्वपक्षीय सदस्यांच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली होती. या निधीचे नियोजन करताना पाणीपुरवठा आणि स्वच्छतेशी संबंधित कामांना महत्त्व देण्यात आले आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी विकास निधीचे नियोजन योग्य पद्धतीने केले जाईल, असे स्पष्ट केलेले आहे, तर शासनाच्या निकषानुसार निधीचे वाटप करण्यात आल्याचा दावा मुख्य लेखाधिकारी राहुल कदम यांनी केला आहे.

चार वर्षांपासून प्रलंबित असलेला निधी आता उपलब्ध झाल्याने ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांना त्याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे. विशेषतः उन्हाळ्यात पाणीटंचाई जाणवणाऱ्या गावांमध्ये या निधीतून आवश्यक कामे केल्यास पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

**चार वर्षांचा थकीत निधी प्राप्त**

जिल्हा परिषदेची कार्यकारिणी अस्तित्वात नसल्यामुळे व निवडणुका लांबणीवर पडल्यामुळे सन २०२२-२३ ते २०२५-२६ या चार वर्षांचा १५व्या वित्त आयोगाचा निधी शासनाकडून प्रलंबित राहिला होता. हा निधी मार्च २०२६अखेर जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात आला. त्यामुळे यापूर्वी मंजूर असलेली कामे रद्द करून ग्रामविकासाला गती देण्यासाठी सुधारित विकास आराखडा या विशेष सभेत मांडण्यात आला होता.

### वर्षनिहाय प्राप्त निधीचा तपशील

| वर्ष | निधी (रुपयांत) |
|---|---|
| २०२२-२३ | १३,८९,०८,९८४ |
| २०२३-२४ | १२,९१,८०,८९१ |
| २०२४-२५ | १३,५६,३१,९४१ |
| २०२५-२६ | १३,३५,५९,१७४ |

**एकूण मंजूर निधी : ५२ कोटी ७२ लाख ८० हजार ९९०**

**असे होईल निधीचे वाटप**

३० टक्के -निधी स्वच्छतेच्या कामांवर, ३० टक्के-निधी पाणीपुरवठ्याच्या योजनांवर आणि ४० टक्के निधी इतर मूलभूत विकासकामांवर खर्च केला जाणार आहे.

# तरुणीच्या पोटात गेलेली पिन यशस्वीरित्या काढली बाहेर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील १९ वर्षीय तरुणीच्या पोटात अडकलेली टाचणीसारखी टोकदार पिन एंडोस्कोपीच्या माध्यमातून यशस्वीरित्या काढण्यात आली. ही उपचार प्रक्रिया बी. के. एल. वालावलकर रुग्णालय डेरवण, सावर्डे येथे ग्रॅस्ट्रोलॉजिस्ट डॉ.आनंद जोशी यांनी केली.

महाड येथील एका खेडेगावात राहणाऱ्या १९ वर्षीय मुलीने खेळता खेळता एक टोकदार पिन तोंडात धरली होती. त्याचवेळी अचानकपणे ती पिन तिच्या घशात गेली. मुलीने घाबरून हि गोष्ट आपल्या आई वडिलांना सांगितली. आई वडीलांनी तिला त्वरीत शासकीय रुग्णाल्यात दाखल केले. तेथे एक्स-रे केल्यावर ती पिन मुलीच्या जठरामध्ये आढळली.

तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मुंबई किंवा पुणे येथे उपचारार्थ दाखल करण्यासाठी सांगितले. परंतु हा खर्च न परवडण्याजोगा असल्याकारणाने तिच्या वडीलांनी बी. के. एल. वालावलकर रुग्णालय गाठले. तेथे प्रसिद्ध ग्रॅस्ट्रोलॉजिस्ट डॉ. आनंद जोशी यांनी एंडेस्कोपीद्वारे पिन काढण्याचा निर्णय घेतला. अत्यंत काळजीपूर्वक करण्यात आलेल्या प्रक्रियेत कोणतीही मोठी शस्त्रक्रिया न करता एंडोस्कोपीच्या सहाय्याने पिन बाहेर काढण्यात आली. हे उपचार अत्यंत अल्प दरात उपलब्ध झाले.



# शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी १५ नोव्हेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज करा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागामार्फत सन २०२४-२५ आणि २०२५-२६ या वर्षांसाठी प्रतिष्ठेच्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक क्रीडा मार्गदर्शक, खेळाडू, दिव्यांग खेळाडू तसेच साहसी उपक्रमांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या खेळाडू व व्यक्तींनी १५ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ११ वाजून ५९ मिनिटे ५९ सेकंदांपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन क्रीडा विभागामार्फत करण्यात आले आहे.

राज्यातील उत्कृष्ट खेळाडू आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यामध्ये क्रीडा क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तींसाठी जीवन गौरव पुरस्कार, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, महिला क्रीडा मार्गदर्शकांसाठी जिजामाता राज्य क्रीडा पुरस्कार, तसेच खेळाडू, दिव्यांग खेळाडू आणि साहसी उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांसाठीच्या पुरस्कारांचा समावेश आहे.

शासनाच्या २९ डिसेंबर २०२३ आणि २५ जानेवारी २०२४ रोजीच्या निर्णयांनुसार निश्चित करण्यात आलेल्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सुधारित नियमावली, २०२३ नुसार ही अर्ज प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

पुरस्कारासाठी इच्छुकांनी https://sports.maharashtra.gov.in या क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावेत. निर्धारित मुदतीनंतर अर्ज स्वीकारले जाणार नसल्याने पात्र इच्छुकांनी अंतिम मुदतीपूर्वी अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन क्रीडा विभागाने केले आहे.

# वासांबे ग्रामपंचायतीला कायमस्वरुपी अधिकाऱ्याची प्रतीक्षा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रुप ग्रामपंचायत वासांबे (मोहोपाडा) येथे कायमस्वरूपी ग्रामपंचायत अधिकारी उपलब्ध नसल्याने प्रशासकीय कामकाजाचा प्रश्न गंभीर बनला आहे. या ग्रामपंचायतीच्या हद्दीत सुमारे ७२ हजार लोकसंख्या असल्याचे सांगण्यात येते. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायतीत अधिकारीच नियमित उपलब्ध नसल्याने नागरिकांसह शाळकरी विद्यार्थ्यांना विविध प्रशासकीय कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीकडे गटविकास अधिकारी आणि वरिष्ठ प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.



वासांबे (मोहोपाडा) ग्रामपंचायत हद्दीत मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती असून, नागरिकांना विविध दाखले, शासकीय योजनांशी संबंधित कागदपत्रे आणि इतर प्रशासकीय कामांसाठी ग्रामपंचायत कार्यालयात जावे लागते. विशेषतः शाळकरी विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामांसाठी आवश्यक कागदपत्रे मिळविताना विलंब होत असल्याच्या तक्रारी आहेत, मात्र कार्यालयात ग्रामपंचायत अधिकारी उपलब्ध नसल्यास नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याचे चित्र आहे. वेळ आणि पैशांचा अपव्यय होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. मोठ्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायतीत नियमित अधिकारी उपलब्ध असणे ही केवळ प्रशासकीय गरज नसून नागरिकांच्या दैनंदिन कामांसाठी आवश्यक बाब आहे.

मिळालेल्या माहितीनुसार १० जुलै २०२६ रोजी ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील यांची बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी कायमस्वरूपी अधिकाऱ्याची नियुक्ती झालेली नसल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर तात्पुरत्या स्वरूपात ग्रामपंचायत अधिकारी वैशाली जाधव यांच्याकडे कार्यभार सोपविण्यात आला होता. मात्र, त्यांनीही गटविकास अधिकाऱ्यांकडे राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून त्या कार्यालयात येत नसल्याचा दावा करण्यात येत असल्याने ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कामकाजाबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.

ग्रामपंचायतीतील प्रशासकीय अडचणींचा परिणाम विकासकामांवरही होत असल्याच्या तक्रारी आहेत. गेल्या चार महिन्यांपासून ग्रामपंचायत हद्दीतील अनेक विकासकामे थांबल्याचा दावा काही सदस्यांकडून करण्यात येत आहे. तसेच यापूर्वी केलेल्या कामांची बिले रखडल्याची तक्रारही काही सदस्यांनी केली आहे. संबंधित प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन ग्रामपंचायतीला नियमित अधिकारी उपलब्ध करून द्यावा, नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावावीत आणि विकासकामांच्या सद्यस्थितीबाबत स्पष्टता द्यावी, अशी मागणी होत आहे.

**ग्रुप ग्रामपंचायत वासांबेकरिता वरिष्ठांकडून नव्याने ग्रामपंचायत अधिकारी येणार असल्याचे समजते, परंतु अद्याप स्पष्ट नाही. या ग्रामपंचायतीत सोमवार, दि.१९ ऑक्टोबरपासून वेळेवर ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित राहील.**

**-संदीप कराड**
**गटविकास अधिकारी,**
**खालापूर पंचायत समिती**

# नागोठण्याच्या श्रेयाताई कुंटे यांच्यावर पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघाची जबाबदारी

**नागोठणे : बातमीदार**

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा तथा आमदार चित्राताई वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चाच्या सचिव श्रेयाताई केदार कुंटे यांच्यावर पुणे विभागातील भाजपा पदवीधर व शिक्षक मतदारसंघ तसेच पर्वती पुणे विधानसभा मतदारसंघाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



यावेळी बोलताना श्रेयाताई केदार कुंटे म्हणाल्या की, आमच्या नेत्या आमदार चित्राताई वाघ यांनी माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्तीवर विश्वास दाखवून अत्यंत महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. त्याबद्दल मी त्यांची मनापासून ऋणी आहे. पक्षाने माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी ही जबाबदारी निष्ठेने व पूर्ण क्षमतेने पार पाडणार आहे.

पुणे विभाग भाजपा पदवीधर व शिक्षक मतदारसंघ तसेच पर्वती पुणे मतदारसंघात पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांशी समन्वय साधून अथक परिश्रम घेणार असून, भाजपचे उमेदवार विजयी करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करून आमदार चित्राताई वाघ यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरविणार, असा विश्वासही श्रेयाताई कुंटे यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला.नागोठण्याच्या महिला नेतृत्वाला पुण्यात महत्त्वाची जबाबदारी मिळाल्याने स्थानिक भाजप कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

# सीकेटी विद्यालयात सरस्वती पूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून सरस्वती पूजन कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि समाजातील स्त्री शक्तीच्या योगदानाचा गौरव करणे हा होता.



नवरात्रीच्या सणात स्त्री शक्ती, मातृत्वाचा आणि आदिशक्तीचा गौरव केला जातो,याचे महत्व विद्यार्थी जीवनात समजणे अत्यंत महत्त्वाचे असते,यामुळेच हा कार्यक्रम आज आयोजित केला गेला होता .इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना सहभागी करीत तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ स्वाती काळे, पर्यवेक्षिका सौ नीरजा अदुरी यांच्यासह सर्व शिक्षक - शिक्षिकांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला .

यावेळी सरस्वती पूजन ,सरस्वती वंदना ,करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी संगीत शिक्षक आणि विद्यार्थी गायक वृंदानी सरस्वती स्तोत्रे गायली,तसेच विद्यालयातील सर्व शिक्षकांनी "सावर सावर अंबाबाई" हे अतिशय सुमधुर असे भजन सादर केले.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिकानी आपल्या भाषणात सांगितले की, "स्त्री ही साक्षात आदिशक्तीचे रूप आहे. आजच्या विद्यार्थ्यांनी केवळ सण न समजता त्यातील भावना आणि विज्ञान समजून घेतले पाहिजे. प्रत्येक क्षेत्रात आपले नाव कमावले पाहिजे.उपस्थित विद्यार्थ्यांच्या हातून देवीची आरती म्हटली गेली,ज्याने वातावरण अतिशय भक्तिमय झाले होते.

# मराठी माझी देवालाही आवडे विशेष सांस्कृतिक कार्यक्रमात आज महापौर, आयुक्तांचा होणार सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्राध्यापक रंगनाथ पाठारे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन समितीला प्रचंड यश आले आणि दोन वर्षांपूर्वी मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाला. नेमके याचेच औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने मराठी भाषा, संतसाहित्य आणि संगीतपरंपरेचा समृद्ध वारसा उलगडणारा 'मराठी माझी देवालाही आवडे' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम शनिवार, दि. १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे. पनवेल तालुका पत्रकार विकास मंच हे या सोहळ्याचे निमंत्रक आहेत.







महाराष्ट्राची राजधानी महामुंबईचे प्रवेशद्वार असणारी पनवेलच्या नाट्यगृहामध्ये संपन्न होणाऱ्या या सोहळ्यात पनवेल महानगरपालिकेच्या दशकपूर्ती सोहळ्या निमित्ताने महापौर नितीन भाई पाटील आणि आयुक्त मंगेश चितळे यांना सन्मानित करण्यात येणार आहे. आयोजकांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की संतसाहित्य आणि संगीताच्या माध्यमातून अभिजात मराठी भाषेचा सांस्कृतिक प्रवास रसिकांसमोर उलगडणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. मराठी भाषेतील भक्तिरचना, संतवाङमय आणि संगीतपरंपरेतील भावसौंदर्य यांचा संगम या कार्यक्रमातून अनुभवता येणार आहे. या कार्यक्रमात कल्पिता राणे नृत्य सादर करणार असून, डॉ. राम पंडित आणि तन्वी गोरे गायन सादर करणार आहेत. कार्यक्रमाची संकल्पना व निवेदन कल्पिता राणे यांचे असून, कल्पिता राणे व कल्पांगण सांस्कृतिक केंद्र हे कार्यक्रमाचे सादरकर्ते आहेत. संगीतसाथीमध्ये किरण चिटणीस (तबला), मंदार जाधव (पखवाज) आणि ओमकार गोखले (कीबोर्ड) यांचा सहभाग आहे. तसेच परिन मोरे आणि अमलेंदु जोशी हे कलाकारही कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. कलाकारांचे संयोजन महेश चव्हाण (टीमवर्क्स मीडिया सोल्युशन्स) यांनी केले आहे.हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

# नागोठण्यातील १२३ घरे नियमित करण्यासाठी भाजप युवा नेते शेखर गोळे यांचा पाठपुरावा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामपंचायतीअंतर्गत रामनगर येथील शासकीय जागेवर १९८९ सालच्या महापुरापासून वास्तव्यास असलेल्या १२३ कुटुंबांच्या अतिक्रमित घरांचा प्रश्न शासनाच्या माध्यमातून मार्गी लावण्यासाठी भारतीय जनता पार्टीचे रोहा तालुका क्रीडा संयोजक तथा रामनगर ग्रामस्थ शेखर केशव गोळे यांनी शासन दरबारी पाठपुरावा सुरू केला आहे.

रामनगर येथील ही घरे राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ व रेल्वे लाईन यांच्या मधील शासकीय जागेवर असून, संबंधित घरांची ग्रामपंचायतीमध्ये नोंद आहे. घरपट्टी व इतर कर ग्रामस्थांकडून नियमितपणे भरले जात असतानाही अतिक्रमणाचा शेरा असल्याने या कुटुंबांना मालकी हक्क तसेच आवश्यक नागरी सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या संदर्भात शेखर गोळे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पेण-सुधागड विधानसभा मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील, माजी खासदार धैर्यशीलदादा पाटील, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर आणि रजिप सभापती वैकुंठदादा पाटील यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.

या पाठपुराव्याच्या अनुषंगाने रजिप सभापती सभापती वैकुंठ पाटील यांनी निवासी जिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्याशी सकारात्मक चर्चा केली असून, शासनाच्या धोरणानुसार रामनगरमधील घरे लवकरात लवकर नियमित करून अतिक्रमणाचा शेरा उठविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आल्याचे शेखर गोळे यांनी सांगितले.

या कामासाठी रोहा तालुका महामंत्री आनंद लाड, ओबीसी मोर्चा तालुका अध्यक्ष कल्पेश माने, शिक्षण सेल तालुका उपाध्यक्ष धनराज उमाळे आणि प्रशांत पानकर यांचे सहकार्य लाभत असल्याचे शेखर गोळे यांनी सांगितले.



पान १ वरुन

## अलिबागमध्ये तरुणाचा संशयास्पद मृत्यू

यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करून मुलाचा मृतदेह पुन्हा रुग्णालयात आणला. वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून शवविच्छेदन करून नंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू असल्याचे निरीक्षक किशोर साळे यांनी सांगितले, तर शवविच्छेदन आणि विसेरा रिपोर्ट प्राप्त झाल्यावरच मुलाच्या मृत्यूचे कारण स्पष्ट होऊ शकेल, असे अतिरिक्त शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी यांनी म्हटले आहे.

# पनवेल मनपाच्या चारही प्रभागात अतिक्रमणविरोधी जोरदार कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुक्त मंगेश चितळे यांच्या सुचनेनुसार पनवेल महानगरपालिकेच्या कामोठे, पनवेल आणि कळंबोली, खारघर परिसरातील अनधिकृत फेरीवाले, भाजी विक्रेते तसेच रस्ते आणि पदपथांवरील अतिक्रमणांविरोधात गेल्या काही दिवसांपासून कडक कारवाई सुरू आहे. या कारवाई दरम्यान काही ठिकाणी अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या टेम्पो व हातगाड्या जप्त करण्यात आल्या, तर अनधिकृतपणे लावण्यात आलेल्या नर्सरी आणि इतर अतिक्रमणांवरही कारवाई करण्यात आली.



कामोठे येथील सेक्टर २१ आणि २२मध्ये अनधिकृत भाजी विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान टेम्पो जप्त करण्यात आले तसेच खांदा कॉलनी परिसरातही अतिक्रमणविरोधी मोहीम राबविण्यात आली. पनवेल येथील मार्केट यार्ड परिसरात अनधिकृतपणे रस्त्यावर लावण्यात आलेल्या हातगाड्यांवर तोडक कारवाई करण्यात आली व सर्व सामान जप्त करण्यात आले.

नवीन पनवेल येथील डी-मार्टसमोरील परिसरात अनधिकृत बाजार भरू नये यासाठी अतिक्रमणविरोधी पथकातील कर्मचारी आणि सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले आहेत. या माध्यमातून परिसरात अनधिकृतपणे बाजार भरविण्यास प्रतिबंध करण्यासाठी दक्षता घेतली जात आहे.

कळंबोली परिसरातही अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. पोलीस मुख्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवर अतिक्रमण पथकाने तोडक कारवाई केली, तसेच गणपती तलावाजवळील नर्सरीवरही कारवाई करण्यात आली. रोडपाली बस डेपो परिसरात कारवाई करून भाजीपाला जप्त करण्यात आला. सेक्टर २० मध्ये दुकाने हॉटेल्स बाहेरील अनधिकृत शेडवर जेसीबीच्या साह्याने मोठी तोडक कारवाई करण्यात आली.यावेळी उपायुक्त रविकिरण घोडके उपस्थित होते.

खारघरमधील अनधिकृत नर्सरीवर तसेच फुटपाथवरील अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. अतिक्रमण विभागाच्या पथकाच्या मार्फत आसूडगाव पेट्रोल पंपाजवळील पदपथावर करण्यात आलेली अतिक्रमणे तसेच अनधिकृत नर्सरी हटविण्यात आली. कामोठे, खारघर, पनवेल आणि कळंबोली परिसरातील रस्ते व पदपथांवरील अतिक्रमणे हटविण्यावर महापालिका भर देत असून यापुढे अतिक्रमण कारवाई अधिक कडक करण्यात येणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे यांनी दिली आहे.

## सेवा संकल्प अभियान अंतर्गत विशेष आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने 'सेवा संकल्प अभियान २०२६' अंतर्गत वैद्यकीय आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक १६ ऑक्टोबर रोजी विशेष आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी महापौर नितीन पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, प्रभाग समिती ड सभापती अजय बहिरा, महापालिका सदस्य सुमित झुंजारराव उपस्थित होते.



या शिबिरांमध्ये नागरिकांना विविध आरोग्यविषयक समस्यांवर मोफत तपासणी तसेच तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळाले.या शिबिरांमध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, नेत्ररोग व दंतरोग तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, क्षयरोग (TB) तपासणी, मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया आणि लेप्टोस्पायरोसिस तपासणी, सिकसेल आजार व रक्तक्षय (ॲनिमिया) तपासणी अशा विविध आरोग्य सेवा व तपासणी सेवा देण्यात आल्या. यावेळी सुमारे १०० हून अधिक लाभार्थ्यांनी लाभ घेतला.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या आरोग्य तपासणी शिबिरास मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी, क्षयरोग अधिकारी डॉ उषा राठोड, वैद्यकिय अधिकारी डॉ. नेहा म्हात्रे, वैद्यकिय , वैद्यकीय अधिकारी डॉ. मनिषा चांडक, डॉ. वैद्यकीय अधिकारी डॉ सुरेश पंडित, वैद्यकीय अधिकारी डॉ भक्तराज भोईटे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारीही उपस्थित होते.

या आरोग्य शिबिरा बरोबरच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरामध्ये सुमारे २० हून अधिक नागरिकांनी रक्तदान केले.

## कळंबोलीत कौटुंबिक वादातून पत्नीची हत्या

### पती पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल :** पत्नी इतर लोकांशी फोनवर बोलते आणि तिचे बाहेरील लोकांसोबत अनैतिक संबंध असावेत या कारणावरून पतीने पत्नीची हत्या केल्याची धक्कादायक घटना कळंबोलीत घडली. या प्रकरणी कळंबोली पोलिसांनी आरोपी पती मोनीश रणजीत गोप (वय २७, डिलिव्हरी बॉय, राहणार सेक्टर ४ इ, जे बी कॉम्प्लेक्स, कळंबोली) याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

मोनीश रणजीत गोप आणि त्याची पत्नी पिंकी मोनीश गोप उर्फ सोनिया मोहम्मद अबू खातून हे पती-पत्नी कळंबोली येथे राहतात. आरोपी पती मोनीश गोप याने त्याची पत्नी पिंकी गोप ही इतर लोकांशी फोनवर बोलते तसे तिचे बाहेरील लोकांसोबत अनैतिक संबंध असावेत आणि तिच्या गुगल पे वर इतर व्यक्तीच्या बँक खात्यातून तिला पैसे आले होते. या कारणावरून त्यांच्यात वाद झाला. १५ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री दोनच्या सुमारास त्याने तिच्या चेहऱ्यावर, मानेवर आणि छातीवर हाताने बुक्के मारून ओरबाडले आणि पोटामध्ये हातापायाने मारले. या मारहाणीत पिंकी गोप ही गंभीर जखमी झाली. आणि यात तिचा मृत्यू झाला.

या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर पोलीस उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्त, कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक, आणि त्यांचे पथक घटनास्थळ दाखल झाले. त्यांनी पंचनामा करत आरोपी मोनीश रणजीत गोप याला अटक केली. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.



**पनवेल : सुकापूर येथील जिल्हा परिषद शाळेतील कामाची पाहणी करताना माजी जिल्हा परिषद सदस्य तथा भाजप उत्तर रायगड अनुसूचित जाती सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव आणि भाजप सुकापूर सरचिटणीस उदय म्हस्कर.**

## श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात रंगोत्सव चित्रकला स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

द्रोणागिरी विभागातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्रीमती भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात दिनांक १५ ऑक्टोबर रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.




या स्पर्धेमध्ये जवळपास ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला अनेक विषयांवर चित्रे काढण्यात आले तसेच विद्यार्थ्यांना चित्रकलेबद्दल मार्गदर्शन करण्यातआले याप्रसंगी कलरिंग,ग्रीटिंगकार्ड मेकिंग कॉम्पिटिशन, घेण्यात आल्या .

## समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विधायक उपक्रम राबविण्याबाबत बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच समाजाची शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उन्नती साधण्यासाठी विविध विधायक उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात 'समाज स्वास्थ्य' या विषयावर बैठक आयोजित करण्यात आली.



महापौर नितीन पाटील, सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, प्रभाग समिती ड चे सभापती अजय बहिरा, मोहन गायकवाड, सुभाष गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध विषयांवर चर्चा व विचारविनिमय करण्यात आली. समाजाच्या उन्नतीसाठी विधायक सूचना मांडणे, समाजासाठी स्वतंत्र बुद्धविहार उभारणे, समाज कल्याण केंद्राची (सोशल हॉल) निर्मिती करणे, तसेच महानगरपालिकेमार्फत उपलब्ध होणाऱ्या ५ टक्के मागासवर्गीय कल्याण निधीतून समाजाच्या हिताची आणि सर्वसामान्य नागरिकांच्या उपयोगाची लोकोपयोगी कामे राबविणे, अशा विविध महत्त्वपूर्ण विषयांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. समाजाच्या विकासासाठी केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीतून ठोस कार्यक्रम राबविणे, समाजातील विविध घटकांना एकत्र आणणे आणि उपलब्ध शासकीय निधीचा योग्य विनियोग करून समाजोपयोगी उपक्रमांना चालना देणे, यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले. समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्व समाजबांधवांनी एकत्र येऊन विधायक सूचना मांडाव्यात, विकासात्मक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा आणि समाजाच्या प्रगतीसाठी सहकार्य करावे, असे आवाहन या बैठकीच्या माध्यमातून करण्यात आले. यावेळी समाजातील विविध संस्थाचे प्रतिनिधी, समाज बांधव उपस्थित होते.

# सीकेटीत डॉ.ए.पी.जे.कलाम यांच्या स्मृतींना अभिवादन करत वाचन प्रेरणा दिन साजरा

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नवीन पनवेल येथे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन विदयालयाचे आदरणीय मुख्याध्यापक कैलास म्हात्रे व विद्यालयाचे पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर यांनी केले.



पुस्तकाचे पान हे कागदाचे पान नसते तर ते ज्ञानाचे भांडार असते म्हणून यावर आधारित पुस्तकाचे महत्व सांगणारी नाटिका इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांकडून सादर करण्यात आली. या नाटिकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाचनाची आवड, पुस्तकांचे महत्त्व आणि वाचनामुळे होणारा ज्ञानाचा विकास यांचा प्रभावी संदेश देण्यात आला. मोबाईलच्या वाढत्या वापराच्या काळात पुस्तकांशी मैत्री करून वाचनाची सवय जोपासणे आवश्यक असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त वाचन संकल्प केला. यामध्ये "मी पुस्तकांचा आदर करीन, पुस्तकांची काळजी घेईन, नियमित वाचन करीन, नवनवीन ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करीन आणि आयुष्यभर ज्ञानार्जन करत राहीन. वाचनातून माझे विचार समृद्ध करीन आणि मिळवलेले ज्ञान इतरांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करीन," अशी प्रतिज्ञा विद्यार्थ्यांनी घेतली. या संकल्पातून विद्यार्थ्यांनी वाचनाची गोडी जोपासण्याचा, ज्ञानाची कास धरण्याचा आणि समृद्ध व्यक्तिमत्त्व घडविण्याचा निर्धार व्यक्त केला.

चि. वेदांत शिंदे या विद्यार्थ्याने अग्निपंख या पुस्तकाची माहिती दिली तर चि .मानव म्हात्रे याने वाचाल तर वाचाल हा संदेश देत वाचनाचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाच्या वेळी विद्यालयातील प्राचार्य कैलास म्हात्रे तसेच पर्यवेक्षक हरिश्चंद्र ठाकूर सर सांस्कृतिक विभाग प्रमुख स्वाती पाटील ,राधिका शिर्के, .वीणा देवरुखकर , अश्विनी देशमुखे,ग्रंथपाल घोडेकर, पाटील सर, तसेच इतर शिक्षक वृंद उपस्थित होते. विद्यालयातील शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे वाचन प्रेरणा दिनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

सी के टी इंग्रजी विद्यालयात वाचन प्रेरणा दिवस उत्साहा मध्ये साजरा करण्यात आला.हा कार्यक्रम शाळेच्या अद्ययावत व सुसज्ज अशा ग्रंथालयामध्ये साजरा केला गेला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षिका पूर्वा खेडेकर यांनी केले. या कार्यक्रमांमध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका सौ स्वाती काळे, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी, शिक्षिका स्नेहा पाटील आणि इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

तसेच शाळेच्या ग्रंथालयामधील ग्रंथपाल सूर्यकांत घोडेकर सर, रुचिता घोलप मॅडम, निलेशा पाटील मॅडम, शिल्पा पाटील मॅडम आणि सुशील पाटील सर सुद्धा या कार्यक्रमास उपस्थित होते . इंग्रजी माध्यम विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. स्वाती काळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, जीवनामध्ये वाचन अतिशय महत्वाचे आहे, 'वाचाल तरच वाचाल , आयुष्यात पुढे जाण्यासाठी वाचनाची सवय आपल्या अंगी बाणवली पाहिजे.

पर्यवेक्षिका नीरजा अदुरी यांनी विद्यार्थ्यांना डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्यासारखे जीवन आपण जगले पाहिजे , त्यासाठी आपल्या मन आणि विचारांमध्ये शुद्धता असली पाहिजे.पुस्तके आपल्या जीवनात एका चांगल्या मित्राची भूमिका निभावतात, असे सांगितले.



यावेळी आर्या पवार या विद्यार्थिनीने डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जीवनावरील महत्त्वाच्या घटनांची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली.अनुष्का धिवर या दहावीच्या विद्यार्थिनीने तिने वाचलेल्या डॉ. सुधा मूर्ती यांच्या पुस्तकाचे समीक्षण विद्यार्थ्यांसमोर सादर केले.तसेच तनिष्का गावडे हिने वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व आपल्या छोटेखानी भाषणातून सांगितले.अशा प्रकारे वाचन प्रेरणा दिवस हा उत्साह मध्ये साजरा करण्यात आला.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाची क्षितिजे विस्तारावीत आणि पुस्तकांशी मैत्री दृढ व्हावी, या उद्देशाने मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या हस्ते भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि प्रेरणादायी विचारवंत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व विशद करताना डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाला उजाळा दिला. नियमित वाचनामुळे ज्ञानात भर पडते, विचारांना योग्य दिशा मिळते आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची सवय जोपासण्याचे आवाहन केले. तसेच डॉ. कलाम यांच्या जीवनातील संघर्ष, जिद्द, मेहनत आणि देशाप्रती असलेली निष्ठा या गुणांमधून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी, असे मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांनीही डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे सादर करून त्यांच्या प्रेरणादायी विचारांना उजाळा दिला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमेय झावरे आणि त्रिशा एवलेकर ह्या इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी केले.

या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, ग्रंथपाल निलेशा पाटील, शिल्पा पाटील , सूर्यकांत घोडेकर, सुशिल पाटील, विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

वाचनातून ज्ञान, ज्ञानातून प्रगती आणि प्रगतीतून उज्ज्वल भविष्य हा संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजण्यास आणि त्यांच्यात ज्ञानार्जनाची जिज्ञासा वाढण्यास निश्चितच प्रोत्साहन मिळते.



## संपादकीय

# हा बांगलादेश नाही!

राष्ट्रध्वज हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा आंदोलनाचा नसून संपूर्ण देशाचा आहे. त्यामुळे तिरंग्याच्या प्रतिकात्मक शक्तीचा वापर करताना जबाबदारीचे भान ठेवायलाच हवे. भारताची लोकशाही रस्त्यावरील दबावावर नव्हे, तर संविधान, संसद, न्यायव्यवस्था आणि कायद्याच्या राज्यावर उभी आहे.

**कॉक्रोच जनता पार्टीच्या तिरंगा मोर्चाने शुक्रवारी राष्ट्रध्वज, लोकशाहीतील विरोधाचा अधिकार आणि घटनात्मक संस्थांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न ऐरणीवर आणला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी, मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात एसआयआरवरून उपस्थित केलेले आक्षेप आणि आपल्या कार्यकर्त्यांच्या अटकेच्या निषेधार्थ कॉक्रोच जनता पार्टीने राजधानी नवी दिल्लीत शुक्रवारी 'लहरा दो तिरंगा' आंदोलनाची हाक दिली खरी, मात्र या आंदोलनांच्या आडून देशातील घटनात्मक व्यवस्थेविषयी अविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे आता लपून राहिलेले नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात सुस्पष्ट भूमिका मांडत भारताच्या लोकशाही व्यवस्थेचे वैशिष्ट्य अधोरेखित केले. हा भारत आहे. पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश वा श्रीलंका नाही. त्यांच्याकडे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान नाही. जोपर्यंत आपल्याकडे बाबासाहेबांनी दिलेले संविधान आहे, तोपर्यंत निर्णय संसदच घेईल आणि सत्तापालट निवडणुकीतून लोकशाही मार्गानेच होईल असे फडणवीस यांनी म्हटले असून त्यांच्या या विधानाचा गाभा स्पष्ट आहे. भारतामध्ये राजकीय मतभेद असू शकतात. सरकारविरोधात आंदोलनेही होऊ शकतात, परंतु देशाचा कारभार संविधानाने निर्धारित केलेल्या मार्गानेच चालतो. लोकशाहीतील विरोधाचा अधिकार आणि घटनात्मक संस्थांचा आदर या परस्परविरोधी नव्हे तर एकमेकांना पूरक बाबी आहेत. सीजेपीच्या शुक्रवारच्या आंदोलनामागे वरकरणी जंतर-मंतरवरील घटना आहे. पक्षाचे कार्यकर्ते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना अटक झाल्यानंतर त्यांच्या सुटकेची मागणी करत सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी १६ ऑक्टोबरला कनॉट प्लेसमधील सेंट्रल पार्क येथे तिरंगा आंदोलन आयोजित केले. गुरुवारी दिल्ली उच्च न्यायालयाने हे प्रस्तावित आंदोलन रोखण्यास नकार दिला. मात्र, याचा अर्थ आंदोलनाला बिनशर्त परवानगी मिळाली असा नव्हता. कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांवर कायम असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. दरम्यान नवी दिल्ली महापालिकेने प्रशासकीय कारणास्तव सेंट्रल पार्क १६ आणि १७ ऑक्टोबर रोजी बंद ठेवले. गर्दी, वाहतूक कोंडी आणि सणासुदीच्या काळात व्यापाऱ्यांना होणारा संभाव्य त्रास या बाबीही प्रशासनाच्या चिंतेचा विषय होत्या. त्यानंतर शुक्रवारी पोलिसांनी अभिजीत दिपके यांना त्यांच्या निवासस्थानी नोटीस बजावल्यानंतर ताब्यात घेतले. आंदोलनात सहभागी होण्यासाठी निघालेल्या ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशनच्या अध्यक्षा नेहा बोरा यांनाही मंडी हाऊस परिसरातून ताब्यात घेण्यात आले. नेहा बोरा यांनी आंदोलनाच्या समर्थनार्थ लोकशाही आणि मतदानाच्या अधिकारांचा मुद्दा उपस्थित केला. मात्र त्यांनी अलीकडेच माध्यमांशी बोलताना दिलेला बांगलादेशातील आंदोलनाचा संदर्भ आणि सत्ताबदलाच्या लढाईविषयीच्या वक्तव्यांमुळे त्यांच्यासह समर्थक राजकीय पक्षही अडचणीत आले. भाजपने स्वाभाविकच याकडे लक्ष वेधत आंदोलनाच्या आडून 'अराजकता' पसरवण्याचा प्रयत्न होत असल्याची टीका केली आहे. सरकारवर टीका करण्याचा अधिकार अबाधित राहिला पाहिजे. मात्र त्याचवेळी सार्वजनिक सुव्यवस्थाही राखावीच लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाची ताकद हीच आहे की संघर्ष कितीही तीव्र असला तरी त्याच्या निराकरणासाठी घटनात्मक मार्ग उपलब्ध आहेत. हा भारत आहे आणि भारताच्या लोकशाहीची खरी ताकद संविधानाच्या सर्वोच्चतेतच आहे.**

# एआयच्या युगात ग्रंथालयीन स्थिती आणि शैक्षणिक व्यवस्था

जीवनाच्या सर्वांगीण विकासाचा मूलभूत आधार शिक्षण आहे आणि शिक्षणाला ज्ञान, विचार, संशोधन व आत्मविकासाची दिशा देणारा महत्त्वाचा आधार म्हणजे ग्रंथालय. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, संशोधन संस्था तसेच समाजातील विविध घटकांसाठी ग्रंथालये ही केवळ पुस्तके ठेवण्याची ठिकाणे नसून ज्ञानाची मुक्त केंद्रे आहेत. उत्तम ग्रंथालय एखाद्या विद्यार्थ्याला अभ्यासाची दिशा देऊ शकते, संशोधकाला आवश्यक माहितीपर्यंत पोहचवू शकते आणि सामान्य नागरिकालाही जगातील घडामोडी समजून घेण्याची संधी देऊ शकते. समृद्ध ग्रंथालये ही सशक्त शिक्षणव्यवस्थेची आणि विकसित समाजाची ओळख असतात, ती समृद्ध झाली म्हणजे राष्ट्र सुदृढ झाले.

देशातील ग्रंथालयशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाणारे पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन त्यांनी मांडलेले ग्रंथालयशास्त्राचे पाच मूलभूत नियम आजही अत्यंत महत्त्वाचे आहेत "पुस्तके वापरण्यासाठी आहेत", "प्रत्येक वाचकाला त्याचे पुस्तक मिळाले पाहिजे", "प्रत्येक पुस्तकाला त्याचा वाचक मिळाला पाहिजे", "वाचकांचा वेळ वाचला पाहिजे" आणि "ग्रंथालय ही एक विकसित होणारी संस्था आहे." आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात या विचारांना आधुनिक साधनांची जोड देऊन अधिक प्रभावी ग्रंथालय व्यवस्था उभारता येऊ शकते.

आज माहितीचे प्रमाण प्रचंड वेगाने वाढत आहे. विविध विषयांवर असंख्य पुस्तके, संशोधन लेख, अहवाल, डिजिटल सामग्री प्रकाशित होत असते. या माहितीच्या महासागरातून योग्य, विश्वसनीय, उपयुक्त माहिती शोधून वाचकापर्यंत पोहचविणे हे आधुनिक ग्रंथालयासमोरील मोठे आव्हान आहे. येथे कृत्रिम बुद्धिमत्ता महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

आज जग डिजिटल युगात प्रवेशले आहे. ई-पुस्तके, ई-जर्नल्स, डिजिटल संग्रह, ऑनलाइन डेटाबेस आणि आभासी ग्रंथालयांमुळे जगभरातील ज्ञान काही क्षणांत उपलब्ध होत आहे. इंटरनेटच्या एका क्लिकवर विविध विषयांवरील माहिती मिळते. कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयमुळे या परिवर्तनाला आणखी वेग आला आहे, मात्र तंत्रज्ञानाच्या या प्रगतीबरोबरच भारतातील सर्वसामान्य, ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या मागास भागातील ग्रंथालयांची वास्तविक स्थितीही गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

एआयच्या साहाय्याने वाचकाच्या गरजेनुसार पुस्तके, संशोधन लेख आणि इतर साहित्य शोधणे सोपे होते. मशीन लर्निंगच्या मदतीने वाचकांच्या आवडी, वापराच्या पद्धती आणि मागणीचे विश्लेषण करून संबंधित साहित्य सुचविता येते. मोठ्या संग्रहाचे वर्गीकरण, सूचीकरण आणि अनुक्रमणिका तयार करण्याच्या प्रक्रियेतही वेळ वाचू शकतो. हजारो दस्तऐवजांमधील समान विषय, संदर्भ आणि परस्परसंबंध शोधणे अधिक सुलभ होऊ शकते. संशोधकांसाठी एआयच्या मदतीने साहित्य समीक्षा, संशोधनातील संभाव्य दुवे, संबंधित कागदपत्रे आणि विषयानुरूप माहिती शोधण्याची प्रक्रिया वेगवान होऊ शकते. मोठ्या पुस्तकाचा किंवा संशोधन लेखाचा सारांश तयार करून त्यातील महत्त्वाचे मुद्दे समजून घेणेही सोपे होऊ शकते. नवीन पुस्तक, जर्नल किंवा संशोधन साहित्य उपलब्ध झाल्यावर वाचकांना त्याची माहिती देण्यासाठी स्वयंचलित सूचना प्रणाली वापरता येते.

ग्रंथालयातील वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी चॅटबॉट आणि आभासी सहाय्यकांचा वापर करता येतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांचा वेळ वाचतो आणि वाचकांना तत्काळ प्राथमिक मार्गदर्शन मिळते. दुर्मिळ साहित्याचे डिजिटल जतन, बहुभाषिक माहिती सेवा, संसाधनांचे व्यवस्थापन, साहित्यिक चोरी ओळखणे आणि संस्थात्मक ज्ञान व्यवस्थापन अशा अनेक क्षेत्रांत एआय उपयुक्त ठरू शकते, मात्र एआय हा ग्रंथपालाचा पर्याय नाही. तो ग्रंथपालाची कार्यक्षमता वाढविणारे साधन आहे. एखादी माहिती मिळवणे आणि त्या माहितीची सत्यता, संदर्भ, विश्वासार्हता व उपयोगिता तपासणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. त्यामुळे मानवी विवेक, अनुभव आणि माहितीचे चिकित्सक मूल्यमापन यांना पर्याय नाही.

तंत्रज्ञानामुळे सुविधा वाढतात; परंतु त्याचे दुष्परिणामही दुर्लक्षित करता येत नाहीत. एआयमधून चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती निर्माण होण्याची शक्यता आहे. अल्गोरिदमिक पूर्वग्रह, डेटा सुरक्षा, गोपनीयता आणि कॉपीराइट यांसारखे प्रश्नही महत्त्वाचे आहेत. डिजिटल साधनांवर अतिनिर्भरता वाढल्यास ग्रंथपाल आणि वाचक यांच्यातील मानवी संवाद कमी होण्याची शक्यता आहे. म्हणून ग्रंथालयांनी एआय स्वीकारताना मानवी मूल्ये केंद्रस्थानी ठेवली पाहिजेत. ग्रंथपाल, तंत्रज्ञ, शिक्षक, संशोधक आणि इतर संबंधित घटकांनी एकत्रितपणे तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. आधुनिक ग्रंथालय म्हणजे केवळ संगणक, इंटरनेट आणि एआय ने सज्ज जागा नव्हे; ते विश्वसनीय माहिती, मानवी मार्गदर्शन आणि ज्ञानविकासाचे केंद्र असले पाहिजे.

देशातील काही प्रतिष्ठित विद्यापीठे, आयआयटी, आयआयएम, केंद्रशासित संस्था आणि मोठ्या खासगी शिक्षणसंस्थांनी ग्रंथालयांच्या विकासावर भर दिला आहे, मात्र या सुविधा सर्वसामान्यांपर्यंत समान प्रमाणात पोहचलेल्या नाहीत. उपलब्ध आकडेवारीनुसार देशात सार्वजनिक ग्रंथालयांची संख्या मोठी असली, तरी लोकसंख्येच्या तुलनेत त्यांची उपलब्धता अपुरी आहे.

सांस्कृतिक मंत्रालयाच्या (राजा राम मोहन रॉय लायब्ररी फाउंडेशन) आणि पीआयबीच्या नवीन आकडेवारीनुसार, देशात एकूण ४६,७४६ सार्वजनिक ग्रंथालये आहेत, परंतु त्यापैकी फक्त एक छोटासा भाग आंतरराष्ट्रीय मानकांची पूर्तता करतो. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ लायब्ररी असोसिएशनच्या मानकानुसार, प्रत्येक ३००० लोकांमागे एक सार्वजनिक ग्रंथालय असावे. देशात दर ३६००० लोकांमागे एक सार्वजनिक ग्रंथालय आहे. लोकसंख्येनुसार आपल्याकडे ४४१३९० सार्वजनिक ग्रंथालये असावीत. ग्रंथालय तज्ज्ञांच्या मते आपल्या सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीद्वारे केवळ २० टक्के लोकसंख्येला सेवा दिली जाते. यूएसमध्ये, सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली एकूण लोकसंख्येच्या ९५.६ टक्के लोकांना सेवा देते आणि दरडोई अंदाजे २४९३ रुपये खर्च करते. आपल्या देशातील केवळ नऊ टक्के गावांमध्ये सार्वजनिक ग्रंथालये आहेत. उपलब्ध नोंदीनुसार सार्वजनिक ग्रंथालयांवर सरकारचा सरासरी दरडोई खर्च केवळ ०.०७ पैसे आहे आणि तो राज्यानुसार बदलतो. आईएफएलए अहवाल २०१७नुसार भारतीय सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये सरासरी ५७०० पुस्तके आहेत, तर विकसित देशांमध्ये १०८००० पुस्तकांचा संग्रह आहे. यूनेस्को इन्स्टिट्यूट ऑफ स्टॅटिस्टिक्सच्या २०१८च्या अहवालानुसार, केवळ १२ टक्के भारतीय सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये संगणक आहेत आणि फक्त आठ टक्के इंटरनेट प्रवेश आहेत. २०१६च्या पीटीआई वृत्त लेखानुसार भारतातील कार्यरत ग्रंथपालांपैकी केवळ १० टक्के व्यावसायिकदृष्ट्या पात्र आहेत. हजारो कोटींचे बजेट असूनही अनेक शहरांतील महानगरपालिका त्यांच्यामार्फत चालवल्या जाणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालयांवर खर्च करण्यासाठी पुरेसा पैसा नाही.

ग्रामीण भागातील नागरिकांसाठी ग्रंथालय हे केवळ शैक्षणिक केंद्र नसून विकासाचे माहिती केंद्र बनू शकते. शेती, आरोग्य, रोजगार, सरकारी योजना, कौशल्यविकास, छोटे व्यवसाय, तंत्रज्ञान, पर्यटन, हवामान, पाणी व्यवस्थापन आणि स्थानिक विकास यासंबंधी माहिती नागरिकांना उपलब्ध करून देता येते. डिजिटल साधनांचा वापर करून ग्रामीण भागातील नागरिकांना सरकारी संकेतस्थळे, ऑनलाइन सेवा आणि नवीन संधींशी जोडता येते. म्हणून प्रत्येक गावात, प्रत्येक वस्तीत आणि प्रत्येक शाळेत सक्षम ग्रंथालय उभारण्याची गरज आहे. त्यात पुस्तके, संगणक, इंटरनेट, डिजिटल संग्रह, वर्तमानपत्रे आणि प्रशिक्षित कर्मचारी असणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शालेय ग्रंथालयाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. शाळा ही मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा पाया घडवते, तर ग्रंथालय त्यांच्या विचारविश्वाचा विस्तार करते. पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन विविध विषयांचे वाचन, कल्पनाशक्ती, चिकित्सक विचार, भाषिक कौशल्य आणि सर्जनशीलता विकसित करण्यासाठी ग्रंथालय उपयुक्त ठरते.

ग्रंथालयांचा विकास करण्यासाठी केवळ इमारत उभारणे पुरेसे नाही. सातत्याने पुस्तके खरेदी करणे, जुने साहित्य जतन करणे, डिजिटल संसाधने उपलब्ध करून देणे, इंटरनेट सुविधा वाढविणे, संगणक व इतर उपकरणांची देखभाल करणे आणि प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक आहे. अनेक ग्रंथालयांमध्ये निधीची कमतरता, रिक्त पदे, अपुरे वेतन, जुन्या इमारती, आवश्यक साहित्याचा अभाव आणि देखभालीची समस्या कायम आहे. परिणामी मौल्यवान पुस्तकसंग्रह नष्ट होण्याचा धोका निर्माण होतो. ग्रंथालयांचे अस्तित्व टिकवण्यासाठी केंद्र, राज्य आणि स्थानिक प्रशासनाने दीर्घकालीन धोरण आखणे आवश्यक आहे.

समाजातील देणगीदार, उद्योग, सेवाभावी संस्था आणि नागरिकांनीही ग्रंथालय विकासात सहभाग घ्यायला हवा. उत्सव, जाहिराती आणि विविध कार्यक्रमांसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केला जातो; त्याच समाजाने ज्ञानकेंद्रांच्या उभारणीसाठीही काही संसाधने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

भारताला ज्ञानाधिष्ठित आणि विकसित राष्ट्र बनवायचे असेल तर शिक्षणव्यवस्थेबरोबरच ग्रंथालय व्यवस्थेलाही समान महत्त्व द्यावे लागेल.

**-डॉ. प्रितम गेडाम**



## बदलते तंत्रज्ञान

# 'हे' नंबर्स एटीएम पिन म्हणून टाकू नका, जाणून घ्या कारण

एटीएमचा पिन आपल्याला अगदी नॉर्मल वाटत असला तरी तो आपल्या खात्याचे रक्षण करणारा एक महत्त्वपूर्ण पिन आहे. त्यामुळे एटीएम पिनची संख्या किंवा आकडे जरी सामान्य वाटत असले तरी तुमच्या बँक खात्याची सुरक्षा सुनिश्चित या एटीएम पिनने केली जाते, पण आता यातदेखील धोका होऊ शकतो. काही पिन असे आहे की त्यामुळे तुमचे बँक खाते खाली होऊ शकते.



आजकाल लोक रोख रकमेने कमी खर्च करत आहेत. त्याऐवजी लोक डेबिट आणि क्रेडिट कार्डचा अधिक वापर करत आहेत. एटीएममधून पैसे काढणे, ऑनलाइन शॉपिंग आणि बिले भरणे या सर्व गोष्टींसाठी ते कार्डचा वापर करतात.

दरम्यान, एटीएमकार्ड युजर्सना लक्ष्य करून सायबर फसवणूकही होत आहे. तुमचे एटीएम कार्ड चार अंकी पिन नंबरने सुरक्षित आहे. त्यामुळे ही संख्या जरी सामान्य वाटत असली तरी तुमच्या बँक खात्याची सुरक्षा सुनिश्चित करते, पण अनेक युजर्स त्यांचा पिन नंबर काळजीपूर्वक निवडत नाहीत. प्रत्येकजण अंदाज लावण्यास सोपी संख्या निवडतो. यामुळे हॅकर्ससाठी हे सोपे होते. सायबर एक्सपर्ट्सच्या मते, चुकीचा पिन नंबर निवडल्यास तुमचे पैसे एका क्षणात चोरले जाऊ शकते. या पोस्टमध्ये कोणते पिन नंबर वापरू नयेत? आणि कोणते सुरक्षित आहेत, चला तर मग जाणून घेऊया...

पुनरावृत्ती किंवा अनुक्रमिक संख्या वापरू नका. यामुळे हॅकर्ससाठी हे एक सोपे लक्ष्य बनते. उदाहरणार्थ, १२३४, ११११, २२२२, ३३३३, ००००, ५५५५. त्याचप्रमाणे पिन क्रमांक उलट्या क्रमाने वापरू नका (४३२१). हे खूप असुरक्षित आहे. या व्यतिरिक्त बरेच लोक त्यांची जन्मतारीख पिन नंबर म्हणून वापरतात. उदाहरणार्थ, १३०८ (१३ ऑगस्ट), १५११ (१५ ऑक्टोबर) आणि जन्म वर्ष १९९९, १९९८, २००० पिन क्रमांक म्हणून वापरली जातात. अनेकदा वाढदिवसाचा अंदाज लावणे सोपे असते, कारण ते सोशल मीडिया आणि दस्तऐवजांमध्ये असतात.

याचप्रबरोबर मोबाईल नंबर, वाहन क्रमांक आणि आधार क्रमांकदेखील सुरक्षित नाहीत, कारण त्यांचा सहज अंदाज लावता येतो. त्यामुळे त्यापासून दूर राहणेही चांगले. सायबर सिक्युरिटी रिपोर्ट्सनुसार, त्यांना हॅक करण्यासाठी काही सेकंद लागतात.

# गायनाचार्य पं. भास्करबुवा बखले



## निमित्त

एक अष्टपैलू, चतुरस्त्र प्रतिभेचे श्रेष्ठ गायक कलावंत; गायनाचार्य व अभिजात नाट्यसंगीताच्या परंपरेचे प्रवर्तक अशी पं भास्करबुवा बखले यांची ओळख राहिली आहे. त्यांची आज जयंती. यानिमित्ताने घेतलेला आढावा...

भास्करबुवांचा जन्म १७ ऑक्टोबर १८६९ बडोदे संस्थानातील कठोर या गावी झाला. घरची गरिबी असल्याने प्राथमिक शालेय शिक्षण व त्यानंतर संस्कृत पाठशाळेतले शिक्षण त्यांना फार कष्टाने करावे लागले. त्यांचा आवाज लहानपणापासून गोड असल्यामुळे वर्गशिक्षक त्यांना वारंवार संस्कृत श्लोकपठण करायला लावीत. त्यांच्या या गुणांमुळे पिंगळेबुवा नावाच्या हरिदासाकडे त्यांची संगीत शिक्षणाची सोय झाली. भास्करबुवांच्या आवाजाची कीर्ती पुढे किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीतील भाऊराव कोल्हटकर यांच्या कानी गेली आणि त्यांनी भास्करबुवांना मंडळींत आणले. मंडळीचा मुक्काम इंदूरला असताना भास्करबुवांचा आवाज सुप्रसिध्द बीनकार उस्ताद बंदे अलीखाँ यांनी ऐकला आणि स्वतः होऊन त्यांनी भास्करबुवांना संगीतशिक्षणासाठी गंडा बांधला. किर्लोस्कर नाटक मंडळीच्या रामराज्यवियोग या नाटकात त्यांनी मंथरेची, तर संगीतसौभद्र या नाटकात नारदाची भूमिका केली. सुमारे दोन वर्षे त्यांनी किर्लोस्कर नाटक मंडळीमध्ये काम केले. उच्च दर्जाची गायनकला शिकण्यासाठी ते पुन्हा बडोद्यास आले आणि ग्वाल्हेर घराण्याचे गायक उस्ताद फैजमहंमदखाँ यांचे त्यांनी शिष्यत्व पत्करले. चिकाटीने, मेहनतीने व निष्ठेने त्यांनी खाँसाहेबांकडून विद्या प्राप्त केली आणि खानदानी गवयी म्हणून लौकीक प्राप्त केला. त्यांनी गायलेली नाथ हा माझा, मम आत्मा गमला ही नाट्यपदे खूप गाजली.

उस्ताद फैजमहंमदखाँकडून संगीताचे शिक्षण घेतल्यानंतर त्यांच्याच मार्गदर्शनावरून भास्करबुवांनी आग्रा घराण्याचे उस्ताद नथ्थनखाँ आग्रेवाले यांचा गंडा बांधला. त्यांच्याच सूचनेनुसार त्यांच्या मृत्यूनंतर, भास्करबुवांनी जयपूर घराण्याचे उस्ताद अल्लादियाखाँ यांना गुरू केले आणि त्यांच्या गायकीचे मर्मही आत्मसात केले.

आरंभी किर्लोस्कर आणि नंतर गंधर्व नाटक मंडळीचे ते संगीत गुरू होते. विद्याहरण, स्वयंवर, द्रौपदी यांसारख्या संगीतनाटकांना संगीत देऊन तसेच बालगंधर्व, मास्तर कृष्णराव, गोविंदराव टेंबे यांच्यासारख्या समर्थ कलावंतांना तालीम आणि मार्गदर्शन देऊन मराठी नाट्यसंगीताचे दर्जेदार स्वरूप त्यांनी घडविले व नाट्यसंगीतात सौंदर्ययुक्त व भरीव अशी कामगिरी केली. नाट्यसंगीत त्यांनी अभिजात संगीताच्या पातळीवर नेऊन ठेवले. त्यांनीच घडविलेले हे नाट्यसंगीताचे स्वरूप आजही कमी अधिक फरकाने कायम असल्यामुळे त्यांना नाट्यसंगीताचे 'कुलस्वामी' म्हणून संबोधता येईल. मास्तर कृष्णराव, बालगंधर्व, बागलकोटकर, पाटणकरबुवा बापूराव केतकर वगैरे त्यांची शिष्यमंडळी विख्यात होती. गोविंदराव टेबें, र. कृ. फडके, केशवराव भोळे वगैरे कलावंत त्यांना गुरुस्थानी मानीत असत. रसिकांनी त्यांना 'देवगंधर्व' ही मानाची पदवी दिली.त्यांनी पुणे येथे भारत गायन समाज या संस्थेची स्थापना केली (१९११). भास्करबुवांचे पुणे येथे ८ एप्रिल १९२२ रोजी निधन झाले. संस्था दरवर्षी त्यांच्या स्मरणार्थ देवगंधर्व संगीत महोत्सवाचे आयोजन करते.

**-सुधीर पोटे (मराठी विश्वकोष)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# लवकरपेक्षा उशिरा उठणे चांगले? तज्ज्ञ सांगतात...

अनेकजण रात्री उशिरापर्यंत जागे राहतात आणि सकाळी उशीरा उठतात. आपल्याला लहानपणापासून घरात लवकर झोपा लवकर उठा असे शिकवले जाते, मात्र एका नवीन संशोधनात असं समोर आलंय की, लवकर उठण्यापेक्षा उशिरा उठणे चांगले आहे. चांगली झोप तुम्हाला आतून बरे करू शकते आणि पुढील दिवसासाठी तुमच्या शरीराला ऊर्जा देऊ शकते.



न्यूरोसायन्स जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार असे आढळून आले की, जे उशिरापर्यंत झोपतात ते बुद्धिमत्ता, तर्कशक्ती आणि स्मरणशक्तीच्या चाचण्यांमध्ये चांगले गुण मिळवतात. या विषयी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना हैदराबादच्या अपोलो हॉस्पिटल्सचे सल्लागार न्यूरोलॉजिस्ट डॉ. सुधीर कुमार यांनी सविस्तर माहिती दिली आहे. डॉ कुमार सांगतात दोन प्रकारचे लोक असतात, एक जे व्यक्ती लवकर झोपणे आणि लवकर उठणे पसंत करतात तसेच त्यांच्या क्रियाकलापांचे नियोजन करतात.

दुसरे म्हणजे, उशिरा झोपणे आणि उशिरा उठणे पसंत करतात तसेच त्यांचे नियोजन करतात. रात्री १२ च्या आधी झोपणे गरजेचे आहे, मात्र हल्ली बरेच जण बारा वाजल्यानंतर झोपतात. याचा अर्थ, जेव्हा लोक झोपेचं चुकीचं वेळापत्र फॉलो करतात तेव्हा ते चांगली कामगिरी करण्यात अपयशी ठरतात. संशोधनानुसार उशिरा उठल्यानं काही गोष्टींमध्ये आपल्याला फायदा होत असला तरीही नुकसान हे मोठ्या प्रमाणात होतं.

डॉ. कुमार म्हणाले, सात ते नऊ तास झोपण्याची शिफारस केली जाते. सात तासांपेक्षा कमी किंवा नऊ तासांपेक्षा जास्त झोप घेतल्यास एखाद्या व्यक्तीला लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकाराचा झटका आणि काही प्रकरणांमध्ये कर्करोग यांसारखे आजार होण्याचा धोका असतो; तर एखाद्या व्यक्तीला चांगल्या झोपेपेक्षा कमी झोप मिळत असेल तर अशा प्रकरणांमध्ये धोका जास्त असतो, असे डॉ. कुमार म्हणाले.

फोनच्या व्यसनामुळे आणि सोशल मीडिया आणि टीव्ही पाहण्याच्या सवयीमुळे आजकाल बहुतेक लोक रात्री उशिरापर्यंत जागे राहतात, त्यामुळे त्यांना चांगली झोप लागत नाही आणि आरोग्यावर वाईट परिणाम होतो. मध्यरात्री झोप लागते असं तुमच्याही बाबतीत होत असेल तर अशा परिस्थितीत झोपण्यापूर्वी काही सोपे व्यायाम केल्याने तुम्हाला चांगली झोप येऊ शकते, यामुळे स्नायूंना आराम देण्यासोबतच शरीर लवचिक होण्यासही मदत होते.

# महिला शेतकरी धोरण राबविण्यात महाराष्ट्र देशात पहिले राज्य; सातबाऱ्यावर प्राधान्याने महिलेचे नाव -ना. आदिती तटकरे

**धाटाव : प्रतिनिधी**

शेतकरी, सामान्य माणसांसाठी आताचे शासन विविध प्रभावी उपक्रम राबवीत आहे, अनेक योजना लोकोपोयोगी ठरल्या. सरकारी काम आणि सहा महिने थांब ही सामान्य माणसांची समज दूर करण्यात आम्ही यशस्वी ठरलो. सर्व दाखले, योजना मर्यादित वेळेत मिळत आहेत, प्रशासनावर अवलंबून राहू नयेत, इतकी पारदर्शकता व वेळेची बचत आणली. आता महिला शेतकरी ओळखपत्र धोरण हे देशात सर्वप्रथम राबविणारा महाराष्ट्र हा पहिला राज्य ठरला आहे. सातबाऱ्यावर महिलेचे नाव नव्हते, तिला वंचित राहावे लागत. पण आज सातबाऱ्यावर महिलेचा नाव चढवून शेतकरी ओळखपत्र मिळणार आहे. तरीही पुरुषांचे नाव हटणार नाही. तब्बल ११ हजार महिला शेतकरी ओळखपत्राचे वाटप करण्यात आले असे स्पष्ट प्रतिपादन ना आदिती तटकरे यांनी सेवा संकल्प अभियानांतर्गत रोहा तालुकास्तरीय आयोजित शासकीय सेवांचा लाभ शुभारंभ कार्यक्रमात केले.

तहसील कार्यालय रोहा आयोजित सेवा संकल्प अभियानाचा शुभारंभ मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील सेवेला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सेवा परमो धर्म भावनेतून शासकीय सेवांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सेवा संकल्प अभियान अंतर्गत विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, सभापती विजया पाशिलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे, जिल्हा परिषदेच्या सदस्या निधी जाधव, तहसीलदार डॉक्टर किशोर देशमुख, उपसभापती संजय मांडलूस्कर, कार्याध्यक्ष समीर शेडगे, अँड मनोजकुमार शिंदे, गटनेते किसन मोरे, सदस्य जगन्नाथ धनावडे, अरुणा हंबीर, समृद्धी कोळी, सभापती राजू जैन, महेंद्र दिवेकर, निता हजारे,, गटनेते महेंद्र गुजर, नगरसेवक पूर्वा मोहिते, अल्मास मुमेरे, कृषी अधिकारी महादेव करे, कार्यकारी अभियंता जतीन पाटील यांसह तालुका शासकीय विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्रास्ताविकात प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी रोहा संकल्प अभियान कार्यक्रमाची रूपरेषा विस्तृत केली. १३ कार्यक्रम देण्यात आले आहे. त्यात विविध सेवा उपक्रम सर्व प्रकारची शिबिरे राबवून विकसित भारत, जनसेवक महाकुंभ उपक्रम देणारे महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे, क्रांतिकारी लाडकी बहीण योजना, आता बेटी योजना यासह अनेक उपक्रम सेवा व संकल्प भावनेतून राबविण्यात येणार आहे, या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला याचा निश्चित आनंद आहे, अशी भावना खुटवड यांनी व्यक्त केली.

कोकणात सुका दुष्काळ प्रथमच आले आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरीतील काही भाग दुष्काळग्रस्त जाहीर झाले, त्यात श्रीवर्धन तालुक्याचा समावेश आहे. अन्य तालुक्यात भातशेतीची मोठी नुकसान झाली. त्याबाबत पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत आम्ही संवेदनशील आहोत. पाणी टंचाईशी सामना करावा लागणार आहे. सहा तालुक्यात युद्धपातळीवर बंधारे बांधण्यात येणार आहेत. पाणी टंचाईवर मात करावी लागेल. पशुधन विमा योजनेसाठी शासन ८५ टक्के सहभाग देणार आहे.

मातृवंदना, आयुष्यमान योजना, आपत्ती व्यवस्थापन बाबींचा परामर्श घेत अधिकृत घरे करण्यात रोहा हा एकमेव पहिला तालुका आहे. सेवा संकल्प अभियान कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले असे ना तटकरे यांनी सांगितले. ना आदिती तटकरे यांनी प्रारंभी सर्व विभागवार प्रदर्शनाला भेट दिली, सेवाधारकांची प्रशंसा केली. कार्यक्रमात वन हक्क दावे मंजूर, संजय गांधी निराधार योजना लाभार्थी प्रमाणपत्र, आरोग्य विभागातून टीबी मुक्त ग्रा.पं.तना सन्मानित करण्यात आले, महिला शेतकरी ओळखपत्र यासह विविध योजनांचे प्रमाणपत्र ना आदिती तटकरेंच्या हस्ते लाभार्थींना देण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, तहसीलदार किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार पुंडलिक मोकल, राजेश थोरे, महसूलच्या अधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## खालापुरात टेम्पोची दुभाजक ओलांडून दुचाकीला धडक

**मोहोपाडा :** खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वांवढळ गावाजवळ जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर टेम्पो, रिक्षा आणि दुचाकी यांच्यात अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वार स्वप्नील चौधरी (वय ४०) हे जखमी झाले असून, तीनही वाहनांचे नुकसान झाले आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वप्नील चौधरी हे त्यांच्या दुचाकीने जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरून पुण्याच्या दिशेकडून मुंबईच्या दिशेने प्रवास करीत होते. त्याचवेळी मुंबईकडून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या टेम्पोच्या चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अतिवेगाने व बेदरकारपणे वाहन चालविल्याचा आरोप आहे. या टेम्पोने समोरून जात असलेल्या रिक्षाला पाठीमागून धडक दिली. त्यानंतर टेम्पो महामार्गाचा दुभाजक ओलांडून विरुद्ध दिशेच्या मार्गावर गेला आणि मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या स्वप्नील चौधरी यांच्या दुचाकीला धडकला.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मऔविम

प्रस्तावासाठी विनंती (RFP) सूचना क्रमांक GEM/२०२६/B/८१६०४६९ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | Selecting and on-boarding Consultant for Goods & Service Tax (GST) Compliance |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २१.१०.२०२६ ते दिनांक १९.११.२०२६ पर्यंत https://gem.gov.in/ या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

## पालीत महिलांच्या जिद्दीला, संघर्षाला आणि कर्तृत्वाला सलाम




**पाली : प्रतिनिधी**

महिलांचे कर्तृत्व, जिद्द, संघर्ष आणि सामाजिक योगदानाचा गौरव करणारा 'नारी शक्ती सन्मान सोहळा' पाली येथे उत्साहात पार पडला. हॉटेल एडिशियाच्या वतीने आयोजित या विशेष सोहळ्यात प्रशासन, पोलीस सेवा, सामाजिक कार्य, आरोग्य, राजकारण, कृषी, क्रीडा आणि महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राज्य आणि जिल्ह्यातील २२ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमात पोलीस अधीक्षक आँचल दलाल, यांच्यासह प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. राजश्री कटके, जगप्रसिद्ध अंकशास्त्रज्ञ श्वेता जुमानी, क्रेया संस्थेच्या संचालिका स्वप्निता गिरी, भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा चित्राताई पाटील आणि माजी जिल्हा परिषद अध्यक्षा ॲड. नीलिमा पाटील, लताताई कळंबे आदी विविध क्षेत्रांतील प्रतिभावंत मान्यवर महिलांची या सोहळ्याला उपस्थिती लाभली. यांच्या उल्लेखनीय व प्रेरक कार्याचा गौरव ही या सोहळ्यात करण्यात आला. महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी देखील नारी शक्ती सन्मान सोहळा आयोजनाचे कौतुक केले. लोकप्रतिनिधी म्हणून नारी शक्ती सन्मान स्वीकारताना मनस्वी आनंद व अभिमान वाटतं असल्याचे त्यांनी म्हटले.

या नारी सन्मान सोहळ्यात पेण येथील अहिल्या महिला मंडळाच्या अध्यक्षा अश्विनी गाडगीळ, अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, समाजसेविका वर्षा राजेश मोरे, आंतरराष्ट्रीय कराटे प्रशिक्षक शीतल गायकवाड, नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, ॲड. आरती गुप्ता, समाजसेविका लताताई कळंबे, कांचनताई जाधव आणि तनुजा घरत, नाजुका गुरव यांचाही सन्मान करण्यात आला.

### पनवेल महानगरपालिका, पनवेल

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं ४१० २०६

**पाणी पुरवठा विभाग**

**जाहिर आवाहन**

गतवर्षी अल-निनोच्या प्रभावामुळे कमी प्रमाणात पाऊस झालेला आहे. पाऊस पुरेसा प्रमाणात न झाल्यामुळे पावसाळ्याच्या कालावधीमध्ये सुध्दा पाणी टंचाई निर्माण झालेली होती. या पार्श्वभुमीवर दिनांक ०५/१०/२०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने अल-निनोच्या पार्श्वभुमीवर राज्यातील उपलब्ध जलसाठ्यांचे दि. ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत काटकसरीने, प्राधन्यक्रमाने व नियोजनबध्द पध्दतीने व्यवस्थापन करून पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता निश्चित करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. सदर शासन निर्णयामध्ये राज्यातील उपलब्ध जलसाठ्याचे दि.३१/०८/२०२७ पर्यंत नियोजन करण्याचा प्रस्ताव निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयानुसार महानगरपालिकेने उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करुन पाणी गळती कमी करण्यासाठी विशेष मोहिम राबवावी, असे नमुद आहे.

पनवेल महानगरपालिकेस विविध स्त्रोतातून पाणी पुरवठा होतो. त्यामधील उपलब्ध पाणीसाठा भविष्यात पाणी टंचाई निर्माण होऊ नये करिता काटकसरीने व जपून वापरण्याचे नियोजन आहे. त्यामुळे पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना खालील प्रमाणे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

- पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा वापर जपून व काटकसरीने करावा.
- पिण्याच्या पाण्याचा अपव्यय टाळावा.
- वाहने धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करु नये. तसे आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
- घरातील व संकुलामधील पाण्याच्या साठवण टाक्या भरुन वाहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.
- घरातील पाण्याच्या नळाची गळती असल्यास तातडीने दुरुस्त करुन घ्यावी. गरज नसताना पाण्याचे नळ चालू रहाणार नाही याची दक्षता घ्यावी.
- घरामध्ये साठवून ठेवलेले पाणी शिळे झाले असे समजून ओतून देण्यात येऊ नये.
- शहरातील तरण तलावासाठी पिण्याच्या वापर करण्यात येऊ नये, तसे आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
- बांधकाम प्रकल्पाला कामगारांना पिण्यासाठी देण्यात आलेल्या नळजोडणींच्या पाण्याचा वापर फक्त कामगारांना पिण्यासाठी होईल याची काळजी घ्यावी. त्या व्यतिरिक्त बांधकामासाठी वापर आढळल्यास विनाकल्पना नळजोडणी खंडीत करुन दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
- वरीलप्रमाणे शहरातील नागरिकांनी पिण्याचा पाण्याचा वापर करण्याच्या दृष्टीने दक्षता घेऊन पाण्याचा जपून व काटकसरीने वापर करावा आणि पनवेल महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

**जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/**
**प्र.क्र. ३४८/ ३६९/२०२६**
**दिनांक : १६/१०/२०२६**

**सही/-**
**(मंगेश चितळे)**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

### पनवेल महानगरपालिका, पनवेल

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं ४१० २०६

**जाहीर सूचना**

**विद्युत विभाग**

मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका यांच्या वतीने विद्युत विभागातील पनवेल महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथील जुने उद्वाहक बदलून नवीन उद्वाहक स्थापित करणे कामाचे अंदाजपत्रक बनवण्याकरीता संबंधित Manufacturer/ Dealer/Contractor कडून वेगवेगळ्या बाबींचे दर मागविण्यात करण्यात आली आहे. येत आहे. सदरची माहिती https://panvelcorporation.maharashtra.gov.in/ या वेबसाइटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/**
**प्र.क्र. ३४५/ ३६६/२०२६**
**दिनांक :- १६/१०/२०२६.**

**सही/-**
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

### ग्रुप ग्रामपंचयात वडगांव

**कार्यालय : मु. वाशीवली, पो. पातळगंगा, ता. खालापूर, जि. रायगड**

**जाहीर निविदा सुचना**

ग्रुप ग्रामपंचायत वडगांव ता. खालपूर, जि. रायगड सन २०२६/२७ करिता ग्रामनिधीतून खालीलप्रमाणे कामे करणे कामी नोंदणीकृत व अनुभवी पुरवठादारांकडून /ठेकेदारांकडून निविदा मागविणेत येत आहे. तरी इच्छुक ठेकेदारांकडून सीलबंद निविदा दिनांक १७/१०/२०२६ ते २६/१०/२०२६ या कालावधीत कर्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात स्वीकारणेत येतील.

| अ.क्र | कामाचे नाव | नग | इसारा रक्कम | निधी स्त्रोत | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कार्यालयातील संगणक लॅपटॉप, प्रिंटर्स दुरुस्ती, टोनर रिफिलींग करणे इतर साहित्य पुरवठा करणे | आवश्यकते प्रमाणे | १०००/- | ग्रामनिधी | २७/१०/२०२६ |

**अटी व शशी खालीलपमाणे:**

१) सदर साहित्य दुरूस्ती व पुरवठा बाबत सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये उपलब्ध होईल
२) सदर निविदेसोबत निविदा फी व इसारा रक्कम भरणा करणेची आहे.
३) निविदेसोबत आधारकार्ड, पॅनकार्ड, बँक पासबुकची झेरॉक्स, शासकीय नोंदणीकृत परवाना प्रत जोडणे आवश्यक आहे.
४) मुदतीनंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
५) निविदा सादर करणेचा अंतिम दिनांक २६/१०/२०२६ रोजी दुपारी ठिक३.०० वाजेपर्यंत राहील.
६) सदर निविदा दिनांक २७/१०/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता शक्य असल्यास उपस्थित निविदा धारकांसमोर उघडणेत येतील.
७) कोणतीही एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा पुन्हा निविदा मागविण्याचा अधिकार तसेच निविदा सुचनेत बदल करणेचा अधिकार ग्रुप ग्रामपंचायत वडगांवने राखुन ठेवलेला आहे.
८) अधिकृत पुरवठादारास प्राधान्य देणेत येईल.
९) शासकीय नियमाप्रमाणे जी.एस.टी रक्कम कपात करणेत येतील.
१०) निविदा धारकाने शासकीय परवान्याची प्रत निविदेसोबत जोडणेची आहे.
११) काही अपरिहार्य कारणास्तव बिलाची रक्कम अदा करण्यास विलंब झाल्यास या कार्यालयास कोणताही दावा करता येणार नाही.
१२) बिल जी.एस.टी नोंदीसह असावे.
१३) अटी व शर्तीचा करारनामा रु.५००/- स्टँप पेपरवर करून दयावा लागेल.

**जा.क्र. ३०७/२०२६**
**दिनांक १६/१०/२०२६**

**सही/-**
**श्री. सुहास विष्णु वारे**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगांव**

**सही/-**
**श्री. विनोद चांदोरकर**
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत वडगांव**

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः-

**मौजे - शिवकर, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं./ हि. नं. | क्षेत्र हे.आर. चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मलाकाचे नाव |
|---|---|---|---|
| २५८/१/४ | १-६०-१० पो.ख. १-१५-०० एकूण १-७५-१० पैकी ०-८७-५५ | ८.१४ | वैभव एकनाथ दुधे |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १६/१०/२०२६.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
मो. क्र.: ९९३०३६९८६१

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे व तसे खरेदीखत ही त्यांचेबरोबर केलेला आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**

**मौजे - रिटघर, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | भोगवटादार | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार (रू. पैसे) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ७९ | १ | ० - २० - ५० पो. ख. ० - ०१ - ०० | ४.३७ | श्री. अनंता कानु पाटील |
| | | एकूण ० - २१ - ५० | | |

पनवेल.
दिनांक : १६/१०/२०२६.

**सही/-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, साई साज सोसायटी, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो. नं. ९०२२३१७७७२.

### जाहीर नोटीस

सर्व लोकास या जाहीर नोटीसीने असे कळवीण्यात येते की, मौजे गणेशनगर (जुने गाव खानांव), ता. खालापूर जिल्हा. रायगड येथील खालील प्रमाने हक्क नोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे आशिलांनी संबंधित जमिन मालक १) काशिबाई नथु कुडपाने, २) सुंदर नथु कुडपाने, ३) हिरा नथु कुडपाने, ४) रोहिणी सुरेश पवार उर्फ भद्रिके, ५) ओवी राकेश भद्रिके, ६) मानवी राकेश भद्रिके क्र.५ व ६ यांचे वतीने अ.पा.क हर्षदा राकेश भद्रिके, ७) हर्षदा राकेश भद्रिके, ८) सुषमा विलास शिर्के यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र. | जुना सर्व्हे नंबर | नवीन सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ. हे. आर चौ मी | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | ३३६ | १६१ | ०-३९-२० | ४.३८ |

सबब सदर मिळकतीचा अगर कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तकार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तकारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहाणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तकारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व लोकांस कळावे.

**ठिकाणः रिस**
**दिनांकः १६/१०/२०२६**

**सही/-**
**ॲड. सचिन आर. चाळके**
**(B.A.LL.B.)**
**कार्यालय : गोकुळ नागरी इमारत, पहिला मजला, खोली क्रमांक १०७, गाव रीस, ता. खालापूर, जि. रायगड, महाराष्ट्र, पिन-४१० २२२.**
**मोबाईल : ८६००९९०४६९**

### जाहीर नोटीस

सर्व लोकास या जाहीर नोटीसीने असे कळवीण्यात येते की, मौजे आसरे, ता. खालापूर जिल्हा. रायगड येथील खालील प्रमाने हक्क नोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे आशिलांनी संबंधित जमिन मालक मोहम्मद इलीयास शाह यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ. हे. आर चौ मी | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|
| १ | ९/३ | ०-०८-६० | ०.०२ |

सबब सदर मिळकतीचा अगर कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तकार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तकारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहाणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तकारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व लोकांस कळावे.

**ठिकाणः रिस**
**दिनांकः १६/१०/२०२६**

**सही/-**
**ॲड. सचिन आर. चाळके**
**(B.A.LL.B.)**
**कार्यालय : गोकुळ नागरी इमारत, पहिला मजला, खोली क्रमांक १०७, गाव रीस, ता. खालापूर, जि. रायगड, महाराष्ट्र, पिन-४१० २२२.**
**मोबाईल : ८६००९९०४६९**

# सीकेटी महाविद्यालयाच्या दक्ष परमारची कॅम्पस से संसद अभ्यास दौऱ्यात यशस्वी भरारी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संसदीय लोकशाहीची कार्यप्रणाली, देशाचा समृद्ध ऐतिहासिक वारसा आणि राष्ट्रीय नेतृत्वाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी सी. के. ठाकूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याला मिळाली आहे. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथील तृतीय वर्ष कला शाखेच्या भूगोल विभागाचा विद्यार्थी दक्ष मनोजकुमार परमार याने नवी दिल्ली येथे आयोजित 'कॅम्पस से संसद अटल इरादे, युवा कदम' या राष्ट्रीय अभ्यास दौऱ्यात यशस्वी सहभाग नोंदवून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या दौऱ्यात महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील यांनी प्राध्यापक समन्वयक म्हणून संपूर्ण महाराष्ट्राच्या विद्यार्थी संघाचे नेतृत्व केले.

राज्यसभेचे खासदार विनोद तावडे यांच्या पुढाकाराने आयोजित हा अभ्यास दौरा २८ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत पार पडला. प्रत्यक्ष दिल्लीतील कार्यक्रम २९ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान आयोजित करण्यात आला होता. देशभरातील तरुणांना संसदेचे कामकाज, भारतीय लोकशाहीची वाटचाल आणि देशाचा ऐतिहासिक व राजकीय वारसा जवळून समजून घेता यावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या राष्ट्रीय अभ्यास दौऱ्यासाठी महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून १४५ महाविद्यालयांची निवड करण्यात आली होती. निवड झालेल्या महाविद्यालयांमध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्याची संबंधित महाविद्यालयाचा प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. त्यानंतर निवड झालेल्या १४५ विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या आणि त्यातून ३५ गुणवंत विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली. या कठोर निवड प्रक्रियेत यश मिळवत दक्ष परमार याने राष्ट्रीय स्तरावरील या प्रतिष्ठेच्या अभ्यास दौऱ्यात सहभागी होण्याचा मान मिळवला.



या दौऱ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील यांची 'प्राध्यापक समन्वयक' म्हणून निवड करण्यात आली होती. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या संघाचे नेतृत्व करत दौऱ्याचे नियोजन आणि व्यवस्थापन प्रभावीपणे सांभाळले. विद्यार्थ्यांची सुरक्षितता, शिस्त, प्रवास व्यवस्था, वेळेचे नियोजन तसेच विविध स्थळांच्या भेटींचे समन्वयन यांची जबाबदारी त्यांनी चोखपणे पार पाडली. विद्यार्थ्यांचे गट तयार करणे, त्यांना आवश्यक मार्गदर्शन करणे आणि प्रत्येक उपक्रमात शिस्तबद्ध सहभाग सुनिश्चित करणे यामध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले.

या दौऱ्यादरम्यान 'सहयोगी से संवाद' आणि 'भारत थ्रू द विंडो' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी सहप्रवासी आणि रेल्वे कर्मचाऱ्यांशी संवाद साधत विविध विषयांवरील माहिती जाणून घेतली. त्यामुळे या अभ्यास दौऱ्याला केवळ ऐतिहासिक स्थळांच्या भेटींपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याचे स्वरूप प्राप्त झाले.

दौऱ्याच्या पहिल्या दिवशी, २९ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संग्रहालय, इंडिया गेट आणि कर्तव्य पथाला भेट दिली. तसेच राज्यसभेचे खासदार राघव चढ्ढा यांच्या शासकीय निवासस्थानी आयोजित मुक्तसंवाद आणि स्नेहभोजनात सहभाग घेतला. ३० सप्टेंबर रोजी संसद भवनाला भेट देऊन विद्यार्थ्यांनी संसदीय कामकाजाची माहिती घेतली.

परमार याने मिळवलेले यश आणि प्रा. आकाश पाटील यांनी राष्ट्रीय स्तरावर पार पाडलेली नेतृत्वाची जबाबदारी याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, प्रो. डॉ. बी. डी. आघाव, कला शाखेचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील आणि भूगोल विभागाचे प्रमुख प्रो.डॉ.डी. एस. नारखेडे यांच्यासह प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

# जेबीएसपी संस्थेच्या भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयात विज्ञान प्रदर्शन उत्साहात



**द्रोणागिरी : रामप्रहर वृत्त**

जेबीएसपी संस्थेच्या भगुबाई चांगू ठाकूर विद्यालय, द्रोणागिरी येथे आज शालेयस्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. 'शाश्वततेसाठी विज्ञान 'ही यावर्षीच्या प्रदर्शनाची मध्यवर्ती थीम होती.

या प्रदर्शनाचे उद्घाटन उरण जसखार केंद्र प्रमुख त्रिपाठी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे चेअरमन चंद्रकांत घरत, शाळा कमीटी सदस्य. सुरेश पाटील, सीमा घरत तसेच संस्था शाळा इन्स्पेक्टर संतोष चव्हाण ही उपस्थित होते. परीक्षक म्हणून रोटरी इंग्लिश मेडियम स्कूलच्या निलिमा ठाकूर यांना निमंत्रित करण्यात आले होते.

या प्रदर्शनात
- गट १: इयत्ता ६ वी ते ७ वी - एकूण २६ प्रकल्प
- गट २: इयत्ता ८ वी ते १० वी - एकूण १५ प्रकल्प.

दोन गटात एकूण ४१ विज्ञान प्रकल्प सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोना पाटील यांनी केले. शाळेच्या प्राचार्या श्रीमती अनुराधा काठे मॅडम यांनी सर्वांचे स्वागत केले. केंद्र प्रमुख त्रिपाठी यांनी स्वतः सर्व विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांना भेट देऊन त्यांना मार्गदर्शन केले व विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे कौतुक केले.

## के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाच्या इमारतीचे उद्या भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य व ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या के.गो.लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय पनवेलच्या नवीन भव्य इमारतीचा भूमिपूजन व पायाभरणी समारंभ रविवार, दि.१८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता हुतात्मा हिरवे गुरुजी पथावरील वाचनालयाच्या जागेत होणार आहे.

कार्यक्रमाचे भूमिपूजन ९१व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते होणार आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे, ज्येष्ठ गझलकार व माजी सनदी अधिकारी दिलीप पांढरपट्टे आदी मान्यवर या कार्यक्रमात उपस्थित राहणार असल्याचे वाचनालयाच्या अध्यक्ष अॅड. सुनिता जोशी यांनी कळविले आहे.

# एफ.जी. नाईक महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोपरखैरणे येथील श्रमिक शिक्षण मंडळाच्या एफ. जी. नाईक महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळ, ग्रंथालय समिती आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. चला, पुस्तके वाचूया, स्वतःला घडवूया, या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने ग्रंथ प्रदर्शनासह वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणारे विविध उपक्रम राबविण्यात आले.



कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रताप महाडिक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घोडके, मराठी वाङ्मय मंडळप्रमुख प्रा. सीमा शिंदे, प्रा. समिधा पाटील , प्रा. चिन्मयी वैद्य, ग्रंथालय समिती प्रमुख जयश्री मोरे, प्रा. जान्हवी खामकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रमोद साळुंखे, प्रा. मोनिका पराड, प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्राचार्य प्रताप महाडिक यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासावर प्रकाश टाकला. कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि ज्ञानप्राप्तीच्या ध्यासातून त्यांनी मिळविलेले यश विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी व ग्रंथालयाचा नियमित वापर वाढावा या उद्देशाने ग्रंथालय पुस्तक अभिप्राय उपक्रम नियमित सुरू करण्याची नवीन संकल्पना विद्यार्थ्यांसाठी मांडली. यावेळी विद्यार्थिनी कु. वैभवी बुवा हिने मनोगत व्यक्त करताना डॉ. कलाम यांच्या संघर्षमय जीवनप्रवासातून मिळणारी प्रेरणा, त्यांची जिद्द आणि देशाच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान याविषयी विचार मांडले. सूत्रसंचालन द्वितीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थिनी कु. सेजल पवार व आभार प्रदर्शन मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख प्रा. सीमा शिंदे यांनी केले.

photo- वाचन

## खांदेश्वरच्या माऊलीच्या दर्शनाला पारनेरचे आमदार काशिनाथ दाते यांची कामोठ्यात हजेरी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील खांदेश्वर रेल्वेस्थानकाजवळ आयोजित नवरात्रोत्सवाला पारनेर नगरचे आमदार काशिनाथ दाते यांनी भेट देत खांदेश्वरच्या माऊलीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी दांडिया उत्सवातही सहभाग घेतला. नवरात्रोत्सवासाठी एकत्र आलेल्या भाविकांचा उत्साह पाहून त्यांनी आयोजकांचे कौतुक केले आणि दांडिया खेळणाऱ्या तरुण-तरुणींना प्रोत्साहन दिले.

भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्ष पुरस्कृत जय हनुमान सामाजिक, सांस्कृतिक विकास मंडळ, मोठा खांदा आणि पारनेर रहिवासी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने कामोठे सेक्टर २५ येथे यंदा प्रथमच नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सुरुवातीपासूनच या उत्सवाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, माऊलीच्या दर्शनासाठी तसेच दांडियामध्ये सहभागी होण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे.

रहिवासी संघाचे अध्यक्ष भाऊ पावडे यांच्या संकल्पनेतून कामोठे येथे साजरा होणारा दहीहंडी उत्सव पनवेलसह राज्यात चर्चेचा विषय ठरला आहे. याच सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेला पुढे नेत यंदा नवरात्रोत्सवाची संकल्पना मांडण्यात आली. भाजप ओबीसी मोर्चाचे पनवेल शहराध्यक्ष सतीश पाटील आणि भाऊ पावडे यांनी दोन्ही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसमोर हा प्रस्ताव मांडला. त्याला सर्वांनी एकमताने पाठिंबा दिल्यानंतर नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

आमदार काशिनाथ दाते यांच्या भेटीमुळे उत्सवातील उत्साहात आणखी भर पडली. त्यांनी माऊलीचे दर्शन घेतल्यानंतर दांडिया कार्यक्रमालाही उपस्थिती लावली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अहिल्यानगरमधील नेते प्रशांत गायकवाड, कामोठे येथील पारनेरकरांचे मार्गदर्शक कुंडलिक वाफारे, कामगार नेते मोतीराम कोळी, दिलीप घुले, कृष्णा ढोमे यांच्यासह विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. मुख्य आयोजक सतीश पाटील यांनी आमदार दाते यांचे स्वागत केले. धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक उत्साह यांचा संगम घडविणाऱ्या या नवरात्रोत्सवाला पहिल्याच वर्षी मिळालेला प्रतिसाद आयोजकांचा उत्साह वाढविणारा ठरत आहे.

## नवरंग
### रंग हिरवा



मीनाक्षी नगर महिला मंडळ उसर्ली, पनवेल



गव्हाण-कोपर हायस्कूल शिक्षिका वृंद



श्री गणपती इंग्लिश मीडियम स्कूल शिक्षिका वृंद, शिवकर, पनवेल



मोरू नारायण म्हात्रे विद्यालय, गव्हाण-कोपर

## दुर्गामाता दौड (माळ सहावी)



**पनवेल :** हिंदू समाज हा छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज यांच्या ध्येयधोरणांचा व्हावा ही काळाची गरज आहे. यासाठी नवरात्रोत्सवात आई तुळजाभवानीकडे आशीर्वाद तसेच मागणे मागायला जाणे म्हणजेच दुर्गामाता दौड. ही दुर्गामाता दौड शुक्रवारी करंजाडे, नवीन पनवेल सेक्टर १८ तसेच नानोशी गाव येथे उत्साहात पार पडली. यामध्ये लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला.





# कालव्याची दुरुस्ती, साफसफाई तातडीने करा

## बळीराजा फाऊंडेशनचे निवेदन; पाणीपुरवठा पूर्ववत करण्याची मागणी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यातील आंबेवाडी ते निवी कालव्याची प्रलंबित दुरुस्ती, साफसफाई तातडीने सुरू करावी. त्यानंतर नियमान्वये हंगामी डिसेंबरअखेर कालव्याला सोडण्यात येणारे पाणी पूर्ववत करावे यासह इतर मागण्यांचे निवेदन बळीराजा फाउंडेशनच्या वतीने कोलाड पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले. हंगामी डिसेंबरपर्यंत पाणी सोडण्याची कार्यवाही न केल्यास पुन्हा आंदोलन उभारले जाईल तसेच अधिकाऱ्यांना घेराव घालण्याचा इशारा बळीराजा फाउंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे यांनी यावेळी दिला.



आंबेवाडी ते निवी कालव्याच्या पाण्यासाठी विभागीय शेतकरी बळीराजा फाउंडेशनच्या नेतृत्वाखाली तब्बल पाच सहा वर्षे सातत्यपूर्ण आंदोलन करीत आहे. मागील दोन वर्षापासून कालव्याला अंशतः पाणी आले, परिसर हिरवागार झाला. भाजी, पोल्ट्री व्यवसायिक सर्वजण समाधानी झाले. विहिरी बोअरवेल जिवंत झाल्या. आता कालव्याचे पाणी बिनभोबाट सुरू व्हावे, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

निवेदनात कालव्याची अनेक कामे निष्कृष्ट केली गेलीत, त्या कामांची चौकशी करून ठेकेदाराला काळया यादीत टाकावे, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, दुरुस्ती कामे पूर्ण करून डिसेंबरपर्यंत कालव्याला पाणी सुरळीत करावे, प्रशासनाची हायगय खपवून घेणार नाही असे नमूद करण्यात आले आहे. अभियंता सचिन कदम यांना हे निवेदन देण्यात आले.

यावेळी बळीराजा फाउंडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, संस्थापक राजेंद्र जाधव, सचिव ॲड. दीपक भगत उपाध्यक्ष तुकाराम भगत, महेश कांबळे, शरद जाधव, जितेंद्र जाधव, भूषण मोरे यासह पदाधिकारी उपस्थित होते. चर्चेदरम्यान अभियंता सचिन कदम यांनी सोमवारपासून कालव्याच्या साफसफाईला सुरुवात करणार आहोत. महत्त्वाची दुरुस्ती कामे महिनाभरात पूर्ण करू, पाणी हंगामी डिसेंबरपर्यंत सोडण्याचे प्रयोजन आहे, असे उपस्थित पदाधिकाऱ्यांना आश्वासित केले. कार्य. अभियंता राकेश धाकतोडे यांनी विभागीय शेतकरी ग्रामस्थांची भावना त्यांची पाण्याबाबतची योग्य मागणी आम्ही समजून आहोत. त्यादृष्टीने कालव्याची प्रलंबित कामे पूर्ण करून हंगामी डिसेंबरला पाणी सोडले जाईल, त्यात शंका घेऊ नयेत असे दूरध्वनीवरून सांगितले.

दरम्यान, डिसेंबरअखेर कालव्याला पाणी पूर्ववत केले जाईल या वृत्ताने संभे, पाले, वाशी, लांढर, बोरघर, तळाघर विभागात समाधान व्यक्त होत आहे.



चौक : स्वामी नारायण जयंती निमित्ताने गुरुकुलचे प्रमुख स्वामी विश्वेश्वर यांच्या हस्ते शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी त्यांचे अनुयायी अशोक पटेल यांच्यासह गुरुकुलचे शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिलीप सांगळे संपर्कप्रमुखपदी

**माणगाव : प्रतिनिधी**

शिवसेनेच्या दक्षिण रायगड जिल्हा संपर्कप्रमुखपदी दिलीप विजय सांगळे यांची नियुक्ती पक्षाचे सचिव संजय मोरे यांनी केली आहे. हे नियुक्तीपत्र



रायगड लोकसभा मतदारसंघ संपर्कप्रमुख अनिल नवगणे व जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर यांच्या हस्ते मोरे यांना माणगाव शासकीय विश्रामगृह येथे नियुक्तीपत्र देण्यात आले. दिलीप सांगळे हे माणगाव तालुक्यातील पाणसई गावचे रहिवासी असून त्यांचा दांडगा जनसंपर्क व विविध क्षेत्रातील कार्य विचारात घेऊन त्यांची पक्ष नेतृत्वाने दक्षिण रायगड जिल्हा संपर्कप्रमुखपदी नियुक्ती केली आहे.

# गावकऱ्यांना विश्वासात घेऊन काम केल्यास गावाचा विकास शक्य –संदेश शिर्के

## निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी पत्रकारांशी साधला संवाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

गावातील नागरिकांना विश्वासात घेऊन काम केल्यास विरोध कमी होतो, कामे सुरळीत पार पडतात आणि गावाचा विकास साधता येतो, असे मत रायगडचे निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी व्यक्त केले.



अलिबाग प्रेस असोसिएशनच्या वर्धापन दिनानिमित्त गुरुवारी (दि. १५) शिर्के यांच्याशी अनौपचारिक गप्पांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना आपल्या मूळ गावातील विकासाचा प्रवास उलगडला.

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात असलेल्या आडाचीवाडी या शिर्के यांच्या मूळ गावाला मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळाला आहे. याविषयी बोलताना शिर्के म्हणाले की, पूर्वी गावात पाण्याचे मोठे दुर्भिक्ष होते. पाण्याअभावी कामानिमित्त शहरात स्थायिक झालेले अनेक ग्रामस्थ गावाकडे फिरकत नव्हते, मात्र गेल्या १२ वर्षांत गावाचे चित्र बदलले आहे.

आज गावात पुरेसे पाणी उपलब्ध आहे. प्रत्येक कुटुंबाला दुग्धव्यवसायातून महिन्याला सुमारे ३० हजार रुपये उत्पन्न मिळते. अंजिरचेही मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. त्यातूनही वर्षाला चार ते पाच लाख रुपयांचे उत्पन्न मिळू लागले. गावात सुसज्ज व्यायामशाळा आणि अभ्यासिका उभारण्यात आली आहे. पथदिवे तसेच विहिरींवरील पंपांसाठी सौरऊर्जेचा वापर केला जातो. गावातील प्रत्येक घर सौरऊर्जेने प्रकाशमान झाले. ग्रामस्थांच्या सहभागातून गावाने विकासाचा टप्पा गाठला आहे.

आडाचीवाडीतील काही तरुण गावाच्या विकासासाठी झोकून देऊन काम करत आहेत. ग्रामस्थांचा या तरुणांवर विश्वास असल्यानेच गावाला राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळवता आला. योग्य नियोजन, पारदर्शकता आणि ग्रामस्थांचा सहभाग यांच्या बळावर प्रत्येक गावाचा विकास साधता येऊ शकतो, असा विश्वास संदेश शिर्के यांनी व्यक्त केला.

रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी आडाचीवाडीचा आदर्श समोर ठेवला तर ही गावे समृद्ध होऊ शकतील, असेही ते म्हणाले. यावेळी अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर यांनी प्रास्ताविक केले. सचिव राजेश भोसतेकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पवार यांनी केले.




### पारदर्शक कामातून विश्वास संपादन

**कोणतेही काम करताना सर्व ग्रामस्थांना विश्वासात घेतले जाते. चांगले काम करण्याची प्रामाणिक इच्छा असेल, तर दानशूर व्यक्तींकडूनही मदत मिळते. त्यासाठी गावात कुणीतरी पुढाकार घेऊन नेतृत्व करणे आवश्यक आहे. कामात पारदर्शकता असेल, तर लोकांचा विश्वास संपादन करता येतो. प्रत्येकजण प्रत्यक्ष कामात सहभागी होत नसला, तरी त्यांना विश्वासात घेऊन काम केल्यास सहकार्य मिळते आणि विकासकामे करणे सोपे होते, असे शिर्के यांनी सांगितले.**

## नवघर शाळेत वाचन प्रेरणा दिन

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा नवघर येथे भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ व विद्यार्थ्यांचे प्रेरणास्थान डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिक्षक राजेंद्र अंबिके यांनी वाचन प्रेरणा दिनाचे महत्त्व व डॉ. कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याची विद्यार्थ्यांना माहिती दिली.

'आज दिवसभर शाळा नवघरकर वाचत आहेत!' या संकल्पनेतून शाळेत विशेष वाचन उपक्रम राबविण्यात आला. वाचनालयातील पुस्तके विद्यार्थ्यांसाठी खुली करून आवडीचे वाचन करण्याची संधी देण्यात आली. वाचलेल्या पुस्तकाचा सारांश लिहिणे, त्यातील विचार समजून घेणे आणि पुस्तकाविषयी स्वतःचे मत व्यक्त करणे अशा कृतींतून विद्यार्थ्यांनी वाचनाचा आनंद घेतला.

या उपक्रमात वेदांत, आयुष, शुभम, आरुष व भार्गवी या विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांविषयी आपली मते स्वशब्दांत मांडली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड, विचारक्षमता आणि अभिव्यक्ती कौशल्य विकसित होण्यास प्रोत्साहन मिळाले.

"वाचाल तर वाचाल आणि पुढे मोठे व्हाल!" असा संदेश देत शिक्षक राजेंद्र अंबिके यांनी विद्यार्थ्यांना नियमित वाचनाची सवय लावण्याचे आवाहन केले. या उपक्रमाचे नियोजन शिक्षिका रुपाली लेंडवे व अनुजा माने यांनी केले.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करून त्यांना ज्ञानसमृद्ध आणि विचारशील बनविण्याच्या उद्देशाने आयोजित हा उपक्रम शाळेतील वाचनसंस्कृतीला बळकटी देणारा ठरला.

# स्त्री सन्मानासाठी पुरुषभान संवाद; खोपोलीत 'अंनिस'चा उपक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा खोपोलीमार्फत येथील जनता कनिष्ठ महाविद्यालय आणि आनंद शाळा कनिष्ठ महाविद्यालयात स्त्री सन्मानासाठी पुरुषभान संवाद सत्र घेण्यात आले. 'अंनिस'ने नवरात्रीनिमित्त सुरू असलेल्या जागर स्त्रीशक्तीचा–फुलेंच्या विचारांची ज्योत – स्त्रीमुक्तीची वाट या अभियानांतर्गत संवाद सत्र महाराष्ट्रभर आयोजित केले आहे.



या संवादाचा उद्देश फक्त स्त्रियांचे सबलीकरण न करता पुरुषांनासुद्धा या विषयाचे महत्त्व समजावे हा आहे. सध्या आपण पाहत आहोत की जागोजागी कोणत्या न कोणत्या स्त्रीवर लैंगिक अत्याचार झालेले दिसत आहेत, मग ती स्त्री कोणत्याही वयोगटातील असो. या अशा बातम्या आपण सतत वर्तमानपत्रातून किंवा टेलिव्हिजन न्यूजमधून पाहत आहोत. स्त्रियांवरील अत्याचारांसाठी मुख्यत्वे पुरुष हा कारणीभूत असतो. त्यामुळे अशा पुरुषांची मानसिकता बदलणे हे खूप महत्त्वाचे आहे. म्हणून या संवाद सत्राचे आयोजन स्त्री आणि पुरुष यांसाठी एकत्र करण्यात येते.

जनता कनिष्ठ महाविद्यालय व आनंद शाळा कनिष्ठ महाविद्यालयातील संवाद सत्रासाठी संवादक म्हणून खोपोली शाखेच्या महिला विभाग कार्यवाह प्रतिभा मंडावळे उपस्थित होत्या. या सत्रात स्त्री व पुरुष यांची स्वतःची ओळख, ज्यामध्ये आपल्या प्रजनन, अवयव यांची ओळख, स्त्री पुरुष समानता म्हणजे काय? ती आपण कशा प्रकारे ठेवू शकतो? प्रेम व आकर्षण म्हणजे काय? व शेवटी बलात्कारामागील कारणे, त्याचे परिणाम व उपाय सांगण्यात आले.

या उपक्रमाचे प्रास्ताविक खोपोली शाखेचे अध्यक्ष डॉ. सुभाष कटकदौंड यांनी केले. या उपक्रमाकरिता रायगड जिल्हा महिला विभाग प्रमुख सुविधा गायकवाड तसेच कॉलेजचे शिक्षकगण उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी व उपस्थितांनी स्त्रीसन्मानासाठी शपथ घेतली.

## रेवदंड्यात रस्ता काँक्रीटीकरणाचा शुभारंभ

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील ख्रिश्चन बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या माय-दे-देऊस मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाचा भूमिपूजन सोहळा नुकताच झाला. गेल्या अनेक दिवसांपासून दयनीय अवस्थेत असलेल्या या रस्त्याचे नूतनीकरण होणार असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीतील गोळा स्टॉपसमोरील माय-दे-देऊस गल्लीतील रस्ता खराब अवस्थेत होता. त्यामुळे मंदिरात जाणाऱ्या भाविकांसह स्थानिक नागरिकांना या रस्त्यावरून ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागत होता. ही गरज लक्षात घेऊन अलिबाग पंचायत समितीच्या पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून या रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाला मंजुरी मिळाली आहे. यासाठी पंचायत समिती सदस्य शरद गोंधळी यांनी प्रयत्न केले होते. भूमिपूजन समारंभास गोंधळींसह सरपंच प्रफुल्ल मोरे, ग्रामपंचायत सदस्य सुराराम माळी, शिवसेना शहर प्रमुख योगेश पिटनाईक, केदार खोत, विजय हाडकर, समीर आठवले, हर्षल घरत, जोएल उंदीर, भारती मोरे, शेणवईकर आदी उपस्थित होते.



# माणगावमधील नेत्र शिबिरास प्रतिसाद

## ८० जणांची तपासणी, ५० रुग्णांवर शस्त्रक्रिया

**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल आणि माणगावमधील विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन माणगाव जुने एसटी स्टॅन्डजवळ माणगाव याठिकाणी करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी ८० जणांची तपासणी करून ५० नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया केली.



शिबिरासाठी डॉ.प्रकाश पाटील, डॉ.मानसी शहा, प्रतिक्षा गावित, प्रतिक्षा माने, अवंतिका गंडाळे, सागर पाटील, सुप्रिया शिंदे, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा आदींनी परिश्रम घेतले.

नेत्ररोग शिबिराला दर महिन्याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत असून या शिबिराचा लाभ गरीब जनता घेत आहे. गेल्या तीन वर्षात दक्षिण रायगडातील माणगाव, महाड, म्हसळा, श्रीवर्धन, तळा, पोलादपूर, रोहा आदी तालुक्यांतील ४०,१५४हून अधिक रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रिया या शिबिरात यशस्वीपणे करण्यात आली आहे.

# माथेरानमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णसेवा

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान नगरपालिकेच्या बी.जे.रुग्णालयात प्रत्येक गुरुवारी तज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी केली जाणार आहे. नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी आणि उपनगराध्यक्ष तथा आरोग्य सभापती संतोष शेलार यांच्या प्रयत्नातून येथील रुग्णालयात एमबीबीएस, एमडी डॉ.अक्षय पवार हे दर गुरुवारी उपस्थित राहून रुग्णांची तपासणी करणार आहेत.

डोंगरमाथ्यावर असलेल्या माथेरान पर्यटनस्थळी नगरपालिकेचे बी.जे.रुग्णालय आहे. या रुग्णालयात माथेरानबरोबरच पायथ्याशी असलेल्या आदिवासी वाड्यांमधील रुग्णदेखील येत असतात. आता या रुग्णालयात प्रत्येक गुरुवारी सायंकाळी ४ ते ७ वाजेपर्यंत तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित राहणार असून त्यांच्या मार्फत येणाऱ्या रुग्णांची तपासणी केली जाणार आहे.

यामध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब व रक्ताशी संबंधित समस्या, हृदयाशी संबंधित तक्रारी, गॅस्ट्रो/पोटाचे विकार, त्वचारोग, श्वसनाशी संबंधित तक्रारी, दमा, कमी होमोग्लोबिन तसेच इतर सामान्य वैद्यकीय समस्यांबाबत तपासणी केली जाणार आहे. त्यामुळे माथेरानच्या स्थानिक नागरिकांसह आसपासच्या आदिवासी बांधवांना याचा फायदा होणार आहे.

**राहुल शिक्षण प्रसारक मंडळ**

संचालित
सत्याग्रह अध्यापक महाविद्यालय
(मुंबई विद्यापीठ संलग्न)

सुप्पारक भवन, प्लॉट नं. ५२, सेक्टर–१९, खारघर, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड.

**प्रवेश सूचना २०२६–२०२७**

बी. एड. प्रथम वर्ष संस्था/कॉलेज स्तरावरील रिक्त जागांवर प्रवेश इच्छुक, पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे

| अ.नं | कॉलेज कोर्ड | मध्यम | एकूण जागा | कॉलेज/ इन्स्टिट्यूट स्तरावरील रिक्त जागा संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | 2405210811 | मराठी | ५० | १९ |

पात्रता–
१) एन.सी.टी.ई. आणि संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य सी.ई.टी. कक्ष मुंबई यांचे निर्धारित केल्यानुसार आवश्यक पात्रता अटी आणि शर्ती (https://bedcap२६.mahacet.org) पाहावे.

महाविद्यालयात कार्यान्वित सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत नमुन्यातील अर्ज १८ ऑक्टोबर २०२६ पूर्वी कार्यालयात जमा करावे. इंग्रजी, हिंदी, गुजराती, मराठी, उर्दू भाषेत अध्यापनाची व उत्तरे लहिण्याची मुंबई विद्यापीठाच्या धोरणानुसार परवानगी आहे.
पात्रता धारक वद्यार्थ्यांना भारत सरकार व महाराष्ट्र सरकारनुसार शष्यवृत्ती आणि फी–शिप सोयी उपलब्ध आहेत.

सही/–
प्राचार्य

# अर्शदीपच्या जागी भुवनेश्वर कुमार!

## विंडीजविरुद्धच्या पाचव्या टी-२० सामन्यात संधी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील शेवटच्या सामन्यापूर्वी टीम इंडियात एक बदल करण्यात आला आहे. चौथ्या सामन्यात दुखापतग्रस्त झालेल्या अर्शदीप सिंग याच्या जागी पाचव्या व अंतिम सामन्यासाठी वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारचा समावेश करण्यात आला आहे.



गेल्या चार वर्षांपासून टीम इंडियाबाहेर असलेल्या भुवनेश्वर कुमारची न्यूझीलंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत निवड झाली होती, पण त्याआधीच त्याला खेळण्याची संधी मिळाली आहे. बीसीसीआये याबाबतची माहिती दिली आहे.

बीसीसीआयने जाहीर केलेल्या परिपत्रकात स्पष्ट केले की, पुरुष निवड समितीने वेस्ट इंडिजविरुद्धच्या पाचव्या टी-२० मालिकेसाठी भुवनेश्वर कुमारचा भारतीय संघात समावेश केला आहे. सध्या सुरू असलेल्या टी-२० मालिकेतील अंतिम सामना १७ ऑक्टोबर रोजी बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळला जाईल. हैदराबाद येथे बुधवारी झालेल्या चौथ्या सामन्यादरम्यान अर्शदीप सिंगच्या गोलंदाजीच्या खांद्याला दुखापत झाल्यानंतर भुवनेश्वर कुमारचा संघात समावेश करण्यात आला आहे.

अद्ययावत संघ : श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, वैभव सूर्यवंशी, इशान किशन (विकेटकीपर), संजू सॅमसन (विकेटकीपर), तिलक वर्मा (उपकर्णधार), शिवम दुबे, कुलदीप यादव, अक्षर पटेल, रवी बिश्नोई, नितीश कुमार रेड्डी, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, मयंक यादव, नमन धीर, भुवनेश्वर कुमार.

### आज निर्णायक लढत

पाच सामन्यातील टी-२० मालिकेतील चार सामन्यांचा खेळ झाला असून २-२ अशी स्थिती आहे. त्यामुळे पाचवा सामना निर्णायक असणार आहे. आता स्विंगचा किंग असलेला भुवनेश्वर कुमार संघात आल्याने संघाची ताकद वाढणार आहे. तो प्लेइंग ११चा भाग असेल की नाही हे सांगणे कठीण आहे, पण संधी मिळाली तर वेस्ट इंडिजला त्याचा आक्रमणाचा सामना करणे कठीण जाऊ शकते.

# जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत जिंदल विद्यामंदिरचा 'दुहेरी स्मॅश'



**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत जिंदल विद्यामंदिर, साळावच्या विद्यार्थ्यांनी शानदार कामगिरी करत शाळेच्या क्रीडा क्षेत्रात दुहेरी यशाची नोंद केली. १७ वर्षांखालील मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली, तर १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

१७ वर्षांखालील संघात प्रखर झा, साईराज कोठावडेकर, स्वराज देसाई, अनय कांत, तर १९ वर्षांखालील संघात संस्कार साळावकर, वीरसिंग पाटील, कार्तिकेय ठाकूर या विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्यांना शाळेच्या क्रीडा विभागप्रमुख दुर्गाकला सिंग तसेच प्रताप सर आणि वृषाली मॅडम यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल जेईटी प्रमुख डॉ. भावेश भालेराव, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक, प्राचार्य मुकेश ठाकूर, उपप्राचार्य मंगेश बमनोटे यांनी विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे कौतुक करत विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या संघाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# विनू मंकड ट्रॉफीत वीरूच्या लेकाचे झंझावाती शतक

**विजयनगरम : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात विस्फोटक सलामीवीर असा लौकिक असलेल्या वीरेंद्र सेहवागचा थोरला मुलगा आर्यवीर याने विनू मंकड करंडक स्पर्धेत तुफानी शतक ठोकले. त्याने विजयनगरम येथे चंडीगडविरुद्ध सुरू असलेल्या लढतीत १४३ चेंडूत १९ चौकार आणि आठ षटकारांच्या मदतीने १७३ धावांची झंझावाती खेळी केली.



या सामन्यात दिल्लीच्या १९ वर्षांखालील संघाकडून खेळताना आर्यवीरने सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेत फटकेबाजी केली. संघ अडचणीत सापडला असताना एक बाजू लावून मोठी खेळी करीत त्याने संघाला सुस्थितीत नेले. आर्यवीरने अर्णव बुग्गासोबत दिल्लीला ९८ धावांची सलामी दिली. यानंतर अभिराज सिंहसोबत ४८ धावांची भागीदारी केली.

यानंतर काही फलंदाज झटपट बाद झाल्यावर आर्यवीरने शंतनू यादव सोबत पाचव्या विकेटसाठी ८९ धावांची भागीदारी करत दिल्लीला २५० धावांचा टप्पा ओलांडून दिला. अखेरीस आर्यवीर १४३ चेंडूत १७३ धावा काढून बाद झाला.

दिल्लीच्या संघाने ५० षटकांत ६ बाद २८९ धावा फटकावून चंडीगडसमोर विजयासाठी २९० धावांचे आव्हान ठेवले.

# सूर्यकुमार यादवला रणजीच्या दुसऱ्या सामन्यातही डावलले

**मुंबई : प्रतिनिधी**

सध्या सूर्यकुमार यादव भारतीय राष्ट्रीय संघाचा भाग नाही. भारतीय संघात पुन्हा स्थान मिळवण्याच्या उद्देशाने सूर्यकुमारने रणजी ट्रॉफी हंगामासाठी स्वतःची उपलब्धता दर्शवली होती, मात्र मुंबईच्या पहिल्या सामन्यासाठी त्याची निवड झाली नाही. अनेकांना अपेक्षा होती की दुसऱ्या सामन्यात त्याला संघात स्थान मिळेल, परंतु त्याला पुन्हा एकदा निराशाच पदरी पडली आहे.

मुंबईच्या निवडकर्त्यांनी अष्टपैलू खेळाडू सूर्यांश शेडगे आणि प्रतिभावान फलंदाज अंगकृष रघुवंशी यांचा संघात समावेश केला आहे. 'इंडिया ए' विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यातील एकदिवसीय मालिका संपल्यानंतर सूर्यांश रणजी ट्रॉफी सामन्यासाठी उपलब्ध झाला, ज्यामुळे त्याच्या निवडीचा मार्ग मोकळा झाला. दरम्यान, सी.के. नायडू ट्रॉफीमध्ये द्विशतक झळकावल्यानंतर रघुवंशीने मुंबई संघात स्थान मिळवले.

# रोलर स्केटिंग स्पर्धेत वेदक विद्यामंदिरचे यश



**तळा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि रायगड जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय रोलर स्केटिंग स्पर्धेत तळा येथील श्री. गोपीनाथ महादेव वेदक विद्यामंदिरच्या विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले आहे.

### विभाग स्तरावर निवड

आपल्या उत्कृष्ट आणि वेगवान खेळाच्या जोरावर या विद्यार्थिनींनी थेट मुंबई विभागीय स्तरावर झेप घेतली आहे.

स्पर्धेत १७ वर्षे वयोगटातील इनलाइन स्केटिंग प्रकारात सई सुहास वावेकर हिने द्वितीय क्रमांक पटकावला, तर ११ वर्षे वयोगटातील क्वाड स्केटिंग प्रकारात वैष्णवी सुरेश शिंदे हिने तृतीय क्रमांक मिळवला.

या यशाबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, पालकांनी विद्यार्थिनींचे कौतुक करून त्यांना मुंबई विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.











## झंकार नवरात्रोत्सव

















पनवेल : येथील सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने मिडलक्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानात आयोजित झंकार नवरात्रोत्सवात पाचव्या दिवशी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, जयंत पगडे, नगरसेविका राजश्री वावेकर, अस्मिता घरत, माजी नगरसेविका नीता माळी, वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी, संजय जैन आदींची उपस्थिती लाभली. यावेळी दांडिया स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com